विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र
दैनिक
# यशवंत
✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/रविवार दि. १७ मार्च २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१२४ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

**सुविचार**
यदि मैं यह समझ लूँ कि मेरा असली गुण प्रेम करना है, तो मन में द्वेष आ ही नहीं सकता।
(ब्रह्मकुमारीज)

# १४ एप्रिलपासून निवडणुकांना सुरुवात
## १९ ला पहिला टप्पा; ४ जूनला निकाल

नवी दिल्ली : देशातील लोकसभा आणि काही राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे वेळापत्रक आयोगाने आज (शनिवार) दुपारी ३ वाजता पत्रकार परिषदेत सांगितले. सध्याच्या लोकसभेचा कार्यकाळ १६ जून रोजी संपत असून त्यापूर्वी नवीन सरकार स्थापनेची प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी ही घोषणा केली.

लोकसभेच्या निवडणुका १४ एप्रिल २०२४ पासून निवडणुकांना सुरुवात होणार आहे. दिड कोटी कर्मचारी निवडणूक पार पाडतील. देशात ९७ कोटीहून अधिक मतदार आहेत. साडे दहा लाखांहून अधिक मतदान केंद्र आहेत. ७ टप्प्यांमध्ये निवडणुका होणार आहेत. ४ जूनला निकाल लागणार आहे.

पहिल्या टप्प्यातील निवडणूक १९ एप्रिलला होणार आहे.

देशात पारदर्शक आणि निष्पक्ष निवडणुका कोणत्याही अडथळ्याशिवाय पार पाडण्यासाठी, निवडणूक आयोगाने आदर्श आचारसंहितेच्या स्वरूपात काही नियम आणि मानके निश्चित केली आहेत.

५४३ लोकसभा मतदारसंघ
७ टप्प्यात निवडणुका होणार

पहिला टप्पा- १९ एप्रिल ला मतदान होईल, दुसरा टप्पा ४ एप्रिल पासून अर्ज भरता येणार, २६ एप्रिल २०२४ ला मतदान होणार, तिसरा टप्पा १९ एप्रिल पासून अर्ज भरता येणार, चौथा टप्पा १३ मे ला मतदान, पाचवा टप्पा २० मे ला मतदान होईल, सहावा टप्पा २५ मे ला मतदान होणार, सातवा टप्पा १ जून ला मतदान होणार, महाराष्ट्रात ५ टप्प्यात मतदान होणार असून ४ जूनला मतमोजणी होणार आहे.

महाराष्ट्रातील मतदान




महाराष्ट्रामध्ये पाच टप्प्यांमध्ये निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे. यामध्ये २६ एप्रिल, ७ मे, १३ मे, २० मे आणि २५ मे या तारखांना मतदान प्रक्रिया पार पडेल. तर ४ जून रोजी लोकसभा निवडणुकांचा निकाल जाहीर होणार आहे.

मतदार विशेष

१.८२ कोटी नवमतदार, ४८ हजार तृतीयपंथी मतदार, १०० वर्षांवरील मतदार २ लाख, ४९.७ कोटी पुरुष मतदार, ४७.१ कोटी महिला मतदार, १८ ते २१ वयोगटातील २१.५० कोटी मतदार, ८२ लाख प्रौढ मतदार, महिला मतदारांची संख्या १२ राज्यात पुरुषांपेक्षा जास्त आहे.

तरतुदी काय आहेत?

निवडणूक आयोगाने राजकीय पक्ष, उमेदवार आणि मतदारांसाठी सामान्य आचरणापासून ते सभा, मिरवणुका, मतदान, मतदान केंद्र, निरीक्षक आणि जाहीरनामा यांसाठी नियमावली निश्चित केली आहे.

राजकीय पक्ष आणि नेत्यांसाठी नियमावली, विविध जाती आणि समुदायांमध्ये मतभेद किंवा द्वेष वाढवणा-या घडामोडींमध्ये गुंतू नका. धोरणे आणि कृतींवर टीका करा, (पान ७ वर)

# केदार पीठ परिसरात शिवराज पाटील यांचे मोठे योगदान
## पुज्य भिमाशंकरलिंग महास्वामीजींनी केला आवर्जून उल्लेख

लातूर / प्रतिनिधी- केदार पिठाचे जगतगुरूचे देवघर येथे आगमन आज रोजी झाले प्रथमत श्री. शैलेश पाटील व डॉ. अर्चना पाटील यांनी त्यांचे पूजन करून अशिर्वाद घेतले. केदार पिठाधीश श्री.श्री.श्री. १०००८ पूज्य भिमाशंकरलिंग महास्वामीजिंनी देशाचे माजी गृहमंत्री श्री. शिवराज पाटील चाकूरकर यांना केदारपीठ व जगतगुरू श्री. भिमाशंकरलिंग महास्वामीजींच्या संदर्भातील एक ग्रंथ, शाल, रूद्राक्षाची माळ व पुष्पहार देवून आशिर्वाद दिला.



याप्रसंगी बोलतांना महास्वामीजी म्हणाले केदारनाथ येथे चार वर्षापूर्वी मोठा पूर, दरडी कोसळणे, नद्यांच्या पुरामुळे नदीकाठची गावे वाहून गेले. केदारनाथ मंदिराचे दोन्ही बाजूचे पूर्ण वस्त्या वाहून गेल्या, हजारो यात्रे करू आडकून पडले, अनेकजण मृत्यूमुखी पडले. त्यावेळी महास्वामीजीनी चंदीगड येथे जाऊन राज्यपाल श्री. शिवराज पाटील यांना विनंती केली तेव्हा गृहमंत्रालया मार्फत मोठ्या प्रमाणात महास्वामीजिंच्या सूचने प्रमाणे साह्य करण्यासाठी कळविले. कांही हेलीकॉप्टर्स देण्याची व्यवस्था केली. त्यामुळे आडकलेल्या हजारो भक्तांना अन्नाचे पॉकिट, पाणी, दूध, पुरवता आले. अंगावर शहारे आणणाऱ्या त्या भयंकर प्रलयसदृश्य परिस्थितीवर मात करता आली. त्यामध्ये श्री. शिवराज पाटील यांनी मोठी मदत केली हे महास्वामीजींनी उपस्थित भक्ता समोर आवर्जून सांगितले. सर्व उपस्थितांना प्रसाद, रूद्राक्ष माळ देवून आशिर्वाद दिले.

याप्रसंगी सर्वश्री प्रदीप राठी, प्रा. बी.व्ही. मोतीपवळे, श्री. राजेश्वर बुक्के, गुलाब पाटील, गोविंदराव माकणे, बाबूअप्पा सोलापूरे, लक्ष्मीकांत मंठाळे, बालाजी पाटील चाकूरकर, श्री. शाम साखरे, श्री. गुरूनाथ ब्यळे, धर्माजी सोनकवडे उपस्थित होते.

# राज्यातील ५२८ मंदिरांमध्ये जाण्यासाठी वस्त्रसंहिता लागू

पुणे : मंदिरांचे पावित्र्य जपणे आणि भारतीय संस्कृतीचा प्रसार होण्यासाठी पुणे जिल्ह्यातील ज्योतिर्लिंग श्रीक्षेत्र भीमाशंकर यांसह ७१ मंदिरांमध्ये वस्त्रसंहिता लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

यामुळे महाराष्ट्रातील सुमारे ५२८ मंदिरांमध्ये वस्त्रसंहिता लागू झाली आहे, अशी माहिती महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राज्य समन्वयक सुनील घनवट यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी हिंदू जनजागृती समितीचे पुणे जिल्हा समन्वयक पराग गोखले, महाराष्ट्र मंदिर महासंघाचे पुणे जिल्हा निमंत्रक हभप चोरघे महाराज, कसबा गणपती मंदिराच्या विश्वस्त संगीता ठकार, कऱ्हे पठार खंडोबा मंदिर देवस्थानचे विश्वस्त मंगेश जेजुरीकर, चतु:शृंगी देवस्थानचे नंदकुमार अनगळ इ. उपस्थित होते.

राज्य सरकारने २०२० मध्ये राज्यातील सर्वच सरकारी कार्यालयांत वस्त्रसंहिता लागू केली आहे. देशभरातील अनेक मंदिरे, गुरुद्वारा, चर्च, मशिदी आणि अन्य प्रार्थनास्थळे, खासगी आस्थापने, शाळा-महाविद्यालये, न्यायालय, पोलिस ठाणे आदी क्षेत्रांत वस्त्रसंहितेचे नियमानुसार आचरण होत आहे. (पान ७ वर)

# पारदर्शक निवडणुकीसाठी जिल्हा सज्ज

लातूर, / प्रतिनिधी: भारत निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार लातूर लोकसभा मतदारसंघामध्ये ७ मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. निवडणूक कार्यक्रम घोषित झाल्यापासूनच जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी करून निवडणूक शांततामय आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हास्तरीय निवडणूक यंत्रणा सज्ज असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज पत्रकार परिषदेत सांगितले. तसेच यावेळी मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आल्याचे त्या म्हणाल्या.




जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक सभागृहात झालेल्या पत्रकार पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम यांच्यासह प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

लातूर लोकसभा मतदारसंघात १५ मार्च २०२४ रोजीच्या आकडेवारीनुसार एकूण १९ लाख ६९ हजार १७७ मतदार असून एकूण २ हजार १२५ केंद्रांवर मतदान होईल. या मतदारसंघात समाविष्ट असलेल्या सहा विधानसभा मतदारसंघांच्या मुख्यालयाच्या ठिकाणी महिला संचलित मतदान केंद्र, दिव्यांग संचालित मतदान केंद्र आणि युवा संचलित मतदान केंद्र निश्रि्चत करण्यात आली आहेत. तसेच जिल्ह्यात १३८ पडदानशिन मतदान केंद्र निश्रि्चत करण्यात आली आहेत. लोकसभा निवडणूक लढविणारे उमदेवार, राजकीय पक्षांना प्रचारासाठी वाहन परवाना, उमेदवाराचे प्रचार कार्यालय, सभा, लाउडस्पीकर व इतर अनुषंगिक बाबींसाठी घ्यावयाच्या (पान ७ वर)

# भारतीय नौदलाचा हिसका, जहाजासह २३ लोकांची सुटका

नवी दिल्ली : समुद्री चाचे सातत्याने मालवाहू जहाजाला लक्ष्य करत आहेत. अशातच हिंदी महासागरात यावेळी त्यांनी एमव्ही अब्दुल्ला या बांगलादेशी मालवाहू जहाजाचे अपहरण केले होते. सोमालियाची राजधानी मोगादिशूपासून ६०० मैल पूर्वेला ही घटना घडली.




हे जहाज मोझांबिकमधील मापुटो बंदरातून संयुक्त अरब अमिरातीमधील अल हमरिया बंदराकडे जात होते. ज्यामध्ये सुमारे ५८ हजार टन कोळसा होता.

दरम्यान या घटनेची माहिती भारतीय नौदलाला कळाल्यानंतर तात्काळ प्रतिसाद देत, आपली युद्धनौका आणि एक लांब पल्ल्याचे सागरी गस्ती विमान तैनात केले आणि त्याची सुटका केली.

भारतीय नौदल मिशनने एमव्ही अब्दुल्ला जहाजावरील समुद्री चाचांच्या हल्ल्याला एक युद्धनौका आणि एलआरएमपी तैनात करून प्रत्युत्तर दिले, असे नौदलाने एका निवेदनात म्हटले आहे.

# दातृत्व आणि कर्तत्वामुळे खा. शृंगारे यांना पुन्हा नेतृत्व करण्याची भाजपाने संधी दिली-आ. कराड



लातूर दि.१४- गेल्या पाच वर्षात जनतेच्या विश्वासाला पात्र राहून अनेक विकास कामांना न्याय देणारे, सहजतेने भेटणारे आणि सर्वांत मिसळणारे खा. सुधाकर शृंगारे यांच्या दातृत्वामुळे आणि कर्तुत्वामुळे भाजप नेतृत्वाने लातूर लोकसभा मतदार संघातून परत उमेदवारी देवून नेतृत्व करण्याची संधी दिली आहे. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि गोरगरीब जनतेच्या कल्याणासाठी मा. नरेंद्रजी मोदी यांना तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान करण्यासाठी सुधाकर शृंगारे यांना आशीर्वाद देऊन मताधिक्याचा उच्चांक प्रस्थापित करावा असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी केले.

भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी शासनाच्या विविध योजनेतून मंजूर केलेल्या लातूर तालुक्यातील मौजे भिसे वाघोली येथील आमदार निधीतील ७ लक्ष रुपये खर्चाच्या बुद्ध विहाराचे भूमिपूजन, जनसुविधा योजनेअंतर्गत १९ लक्ष रुपयाच्या सिमेंट रस्त्याचे भूमिपूजन, पर्यटन विकास योजनेअंतर्गत १५ लाखाचे श्री हनुमान मंदिर शेडची भूमिपूजन, तीर्थक्षेत्र विकास योजनेतून २ लाखाच्या भगवती आई मंदिराचे सुशोभीकरण, ७ लाखाच्या (पान ७ वर)

# १००१ महिलांकडून होणार श्री सिद्धेश्वरांना महारुद्राभिषेक

लातूर/प्रतिनिधी: ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या महाशिवरात्री यात्रा महोत्सवानिमित्त रविवार दि.१७ मार्च रोजी १००१ महिलांकडून ग्रामदैवत श्री सिद्धेश्वरांना महारुद्राभिषेक केला जाणार आहे.यावेळी महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजनही करण्यात आले आहे.

यात्रा महोत्सवा दरम्यान दरवर्षी लातूर शहरातील १००१ महिला ग्रामदैवत श्री सिद्धेश्वरांना महारुद्राभिषेक करतात. यंदा रविवारी सकाळी ९ वाजता हा महारुद्राभिषेक संपन्न होणार आहे. अभिषेकानंतर महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजनही करण्यात आले आहे.यात रताळ्या (पान ७ वर)

# अशोकराव पाटील निलंगेकर यांनी जेष्ठ कार्यकर्ते वलांडे यांच्या तब्येतीची केली विचारपूस

निलंगा / प्रतिनिधी- आज निलंगा मतदारसंघातील तगरखेडा येथील स्व.डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर साहेब यांचे जेष्ठ निष्ठावंत कार्यकर्ते श्री.वैजनाथ अप्पा शंकरअप्पा वलांडे यांच्या तब्येतीमध्ये बिघाड झाल्याने त्यांच्या निवासस्थानी जाऊन निलंगा मतदार संघाचे प्रमुख नेते तथा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मा.श्री.अशोकराव पाटील निलंगेकर साहेबांनी त्यांच्या तब्येतीची विचारपूस करीत त्यांना धीर दिला. यावेळी यावेळी डिसीसीचे निवृत्त अधिकारी व्यंकटराव शिंदे,सरपंच रणजित



सुर्यवंशी,रमेश राघो,संजय थेटे,संतोष स्वामी,मनोज स्वामी,राष्ट्रवादीचे लक्ष्मण कांबळे,देवेंद्र बिराजदार,युवक काँग्रेसचे अध्यक्ष अमोल सोनकांबळे,वसंत बोरसुरे,तसेच त्याभागातील काँग्रेसचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.





# आंतरराष्ट्रीय नद्यांच्या कृती दिनाचे औचित्य साधून जैवतंत्रज्ञान विभागात विविध स्पर्धेचे आयोजन आणि बक्षिस वितरण

लातूर - १४ मार्च हा दिवस नद्यांसाठी आंतरराष्ट्रीय कृती दिवस म्हणून साजरा केला जातो.कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड,उपप्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, महेश येलगट्टे, माजी विद्यार्थी व संशोधक ऐश्वर्या अंधारे आणि विभाग प्रमुख डॉ. कोमल गोमारे यांनी दीपप्रज्ज्वलन करून केली.



कार्यक्रमावेळी बी.एस्सी.द्वितीय वर्षाची विद्यार्थीनी शेख तबस्सूम यांनी गीताने सर्वांचे स्वागत केले. या दिवसाचे औचित्य साधून महत्त्वाच्या सात नद्यांवर आधारित सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले,तर मूल्यमापन करण्याचे कार्य उपस्थित प्रमुख पाहुणे महेश एस. येलगट्टे आणि पालकांनी केले. पर्णवी ढवारे, सानिया शेख व सागर करे यांनी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला.

जैवतंत्रज्ञान हे व्यापक असे क्षेत्र आहे व त्याचे लाल, नारंगी, पिवळा, निळा, पांढरा, जांभळा, व हिरवा असे सप्तरंगी इंद्रधनुष्याप्रमाने रंग आहेत तर सोनेरी, राखाडी, काळा या नवीन अधिकच्या शाखा आहेत. या सर्वांची माहिती पालकांना व्हावी म्हणून विद्यार्थी व विभागाच्या शिक्षकांनी तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी त्या रंगांची वेशभूषा केली होती. पालकांसमवेत पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्यासाठी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

बायोटेक्नॉलॉजी दिवसानिमित्त आयोजित व्हिडिओ बनविण्याच्या स्पर्धेत सानिया शेख (प्रथम), विजय बोने(द्वितीय) व पर्णवी ढवारे (तृतीय), स्ट्रिक प्लेट स्पर्धेत राजर्षी शाहू महाविद्यालयाचा नाईकवाडे केशव (सर्वोत्तम) व रविकर अंकिता (प्रथम) तर विभागातील प्रकाश गवळी (द्वितीय) आणि उत्कर्षा पाटील (तृतीय), ग्राम स्टेनिंग स्पर्धेत नाईकवाडी तनया (प्रथम), नाईकवाडे केशव (द्वितीय) व जाधव प्रेमकुमार (तृतीय) ठरले.

भालेराव संतोषी व वृषाली पवार यांना अनुक्रमे पदवी व पदव्युत्तर मधून मायक्रोबायोलॉजीस्ट सोसायटी ऑफ इंडियातर्फे सर्वोत्तम विद्यार्थी पुरस्कार देण्यात आला.

विभागातील तृतीय वर्षाचा विद्यार्थी प्रकाश गवळी, द्वितीय वर्षाची विद्यार्थीनी प्रिती बोरगावे व प्रथम वर्षातील अर्पिता कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले. स्पर्धेतील इतर महविद्यालयातून राजर्षी शाहू महाविद्यालयातील बक्षिस विजेते विद्यार्थीनी रविकर अंकिता व नाईकवाडी तान्या यांनी यावेळी विभागातर्फे राबविल्या जाणाऱ्या उपक्रमाबद्दल त्यांच्या भावना यावेळी मांडल्या.

व्हाईट बायोटेक्नोलॉजीचा वापर हा औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात होतो. त्याची महत्वपूर्ण माहिती प्रा. स्वरूप गावकरे यांनी दिली. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड यांनी विभागाची यशस्वी घोडदौड महाविद्यालयासाठी लाभदायक ठरत असून पालक त्याचे साक्षीदार असल्याचे मत व्यक्त केले. यावेळी अभ्यासक्रमातील विविध विषयात विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते संबंधित विषयाच्या शिक्षकातर्फे प्रायोजित बक्षिसाचे वितरण करण्यात आले.विज्ञान विषयाशी संबंधित पुस्तक व इतर शैक्षणिक साहित्य स्वरूपात पारितोषिक देऊन उत्तम जीवनशैली घडवत स्पर्धेच्या युगात आपला ठसा उमटवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यासाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

शैक्षणिक बक्षिसांची घोषणा प्रा. श्रीनिवास कुलकर्णी यांनी केली तर महाविद्यालयतर्फे आयोजित बक्षिसांची घोषणा प्रा.श्वेता मदने यांनी केली. सूत्रसंचालन पर्णवी ढवारे व जान्हवी अंबर यांनी केले. तर आभार प्रदर्शन सानिया शेख यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विभातील डॉ.फिरदौस, प्रा. बिडकर, प्रा.जाधव, प्रा. शिंदे-पाटील व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सोबतीने जैवतंत्रज्ञान मंचच्या विद्यार्थ्यांनी कार्य केले.



# नळदुर्ग येथे समता सैनिक दल वर्धापन दिन साजरा

नळदुर्ग (प्रतिनिधी) - बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया अर्थात भारतीय बौद्ध महासभा अंतर्गत समता सैनिक दलचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया नळदुर्गच्यावतीने समता सैनिकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रिपाइंचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे हे होते. यावेळी समता सैनिक दलाचे राजरत्न बनसोडे व योगेश सुरवसे यांचा शाल, फेटा, पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी रिपाइंचे शहराध्यक्ष मारुती खारवे, मिल्ट्री ७ महार बटालयातून नुकतेच सेवानिवृत्त झालेले नायब सुभेदार दिगंबर बनसोडे, तालुका सदस्य दत्तात्रय बनसोडे, जिल्हा कार्याध्यक्ष अरुण लोखंडे , जळकोट अध्यक्ष अरविंद लोखंडे, शारद गायकवाड, बौध्दाचार्य दादासाहेब बनसोडे, आण्णाराव कांबळे, बापू दुरुगकर, चंद्रकांत बनसोडे, पोपट वाघमारे, हरि गायकवाड, रमेश शिंदे, प्रविण गायकवाड आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मारुती खारवे यांनी केले. यावेळी बाबासाहेब बनसोडे, अरुण लोखंडे, दादासाहेब बनसोडे आदींनी आपापले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरविंद लोखंडे यांनी तर आभार बापू दुरुगकर यांनी मानले.

# आचार संहितेचा भंग होणार नाही याची राजकीय पक्षांनी दक्षता घ्यावी - डॉ. ओंबासे



धाराशिव (प्रतिनिधी) लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा निवडणूक कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. त्यामुळे निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणूक आयोगाच्या नियमानुसार निवडणुकीची कामे पारदर्शक पद्धतीने करण्यात येणार आहे. विविध राजकीय पक्षांनी निवडणुकीच्या काळात आचार संहितेचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी.असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांनी दि.१६ मार्च रोजी केले.

जिल्हाधिकाऱ्यांच्या कक्षात लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आचार संहिता लागू झाल्यानंतर विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनक घोष व उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिरीष यादव यांच्यासह राजकीय पक्षांचे बाळासाहेब सुर्यवंशी, सुनील साळुंखे, जगदीश पाटील, संजय वाघमारे, कलिम पठाण, इंद्रजीत देवकते, प्रतीक माने राजाभाऊ शेरखाने व भारत इंगळे आदी पदाधिकारी उपस्थित होते. पुढे डॉ.ओंबासे म्हणाले की, निवडणुकीच्या काळात कुठे आचार संहितेचा भंग होत असेल तर त्याची तक्रार सी-व्हिजिल ऍपवर नोंदविता येते. तर अडतदारला २ लक्ष रुपये, रिटेलरला १ लक्ष रुपये आणि सामान्य नागरिकाला २० हजार रुपये रोख रक्कम सोबत घेऊन जाता येत असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र या रक्कमेची कागदपत्रे सोबत बाळगणे आवश्यक आहे. यावेळी भरारी पथकांची संख्या वाढविण्यात आली आहे. ईव्हीएम मशीनवर जास्तीत जास्त ३८४ उमेदवारांना मतदान करण्याची क्षमता आहे. त्यापेक्षा जास्त उमेदवार असल्यास मतदान पत्रिकेवर मतदान घ्यावे लागते, असे सांगून डॉ.ओंबासे यांनी एक खिडकी योजना व सुविधा पोर्टल याबाबतची माहिती देऊन त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. यावेळी उपस्थित विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी निवडणुकीच्या अनुषंगाने त्यांच्याशी विविध विषयांवर चर्चा करून त्यांच्या प्रश्नांचे समाधान केले.

# धाराशिव जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचा जागतिक पर्यटनदृष्ट्या विकास व्हावा

धाराशिव दि.१५ (प्रतिनिधी) - जिल्ह्याचा जागतिक दर्जाच्या पर्यटनदृष्टीने नैसर्गिक धार्मिक, ऐतिहासिक पर्यटन स्थळांच्या विकास आराखड्यास मंजुरी मिळावी अशी मागणी पर्यटन जनजागृती संस्थेच्यावतीने पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे शिष्टमंडळाने केली आहे.

धाराशिव येथील विमानतळ येथे आ राणाजगजितसिंह पाटील यांच्या समन्वयाने ही भेटी झाली. यावेळी पर्यटन जनजागृती संस्थेचे अध्यक्ष युवराज नळे, सचिव देविदास पाठक, गणेश वाघमारे, बाबा गुळीग, भारतीय जनता पार्टीचे लोकसभा संयोजक नितीन काळे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा अस्मितताई कांबळे, विद्याताई माने, प्रवीण शिरसाठे आदी उपस्थित होते.



दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, धाराशिव जिल्ह्यातील पर्यटन व्यवसायाला चालना देण्यासाठी व जिल्ह्याचे मागासलेपण दूर होऊन आकांक्षीत जिल्ह्यांच्या यादीतून जिल्हा बाहेर पडण्यासाठी, जिल्ह्याचा उत्पन्न निर्देशांक वाढवण्यासाठी पर्यटन व्यवसायाला चालना देणे गरजेचे आहे.

त्यासाठी हातलाई धाराशिव लेणी टुरिझम कॉरिडॉर, तुळजाभवानी मंदिर परिसर व रामदरा तलाव परिसरात पर्यटनाच्या सुविधा वाढवणे, तसेच जिल्ह्यात असलेल्या जैन धर्मियांच्या कुंथलगिरी, काटी सावरगाव, तेर या तीर्थक्षेत्रांना जोडणारा जैन टुरिझम सर्किट विकसित करणे व बारा ज्योतिर्लिंग शिवदर्शन सर्किट विकसित करणे, धाराशिव तालुक्यातील तेर येथील ऐतिहासिक पुरातत्त्व धार्मिक स्थळांचा पर्यटनदृष्ट्या विकास, परंडा तालुक्यातील डोमगाव येथील कल्याण स्वामी समाधी मंदिर, नळदुर्ग व परंडा येथील भुईकोट किल्ले यांचा विकास आराखड्यात समावेश करावा. यासोबतच जिल्ह्यातील ऐतिहासिक पौराणिक पर्यटन स्थळे यांना पर्यटनदृष्ट्या विकसित करण्यासाठी पर्यटन विषयक कौशल्यांचे प्रशिक्षण दिल्यास त्या-त्या पर्यटन स्थळांचे धार्मिक व पौराणिक महत्त्व अधिकृतपणे मांडणाऱ्या टुरिझम गाईड प्रशिक्षण कौशल्य विकास कार्यक्रमाला मान्यता दिल्यास पर्यटन विषयक कुशल मनुष्यबळ निर्मिती होऊन पर्यटन व्यवसाय वाढीस चालना मिळेल आदींसह विविध मागण्या केल्या आहेत.

# सन्मान निधीचा लाभ सर्वच शेतकऱ्यांना द्या- कलंबरकर

देगलूर(प्रतिनिधी): भारत सरकारने शेतकऱ्यांना सन्मान निधी म्हणून २000 रुपयाचा हप्ता (वर्षाला तीन) देत आहे. त्याच धरतीवर महाराष्ट्र सरकारने नमोसन्मान निधी म्हणून २000 रुपयाचा हप्ता (वर्षाला तीन) देत आहे.हा २000 रुपयाचा निधी देण्यासाठी सरकार १ फेब्रुवारी २०१९ पूर्वी जमीन नावावर झालेली असावी अशी अट लावली आहे.

१फेब्रुवारी २०१९ नंतर ज्याच्या नावावर जमीन झाली त्यांना सन्मान निधीचा लाभ मिळत नाही. म्हणजे हा त्या शेतकऱ्यांचा अपमान आहे?

म्हणून,भारत सरकारने व महाराष्ट्र सरकारने सन्मान निधीच्या योजनेसाठी लावलेली १ फेब्रुवारी २०१९ ची अट रद्द करावी व या अटीमुळे सन्मान निधीपासून वंचित राहात असलेल्या मोठ्या प्रमाणातील शेतकऱ्यांना सन्मान निधीचा लाभ द्यावा. अट रद्द केली तर सर्वच शेतकऱ्यांना सन्मान निधी योजनेचा लाभ मिळेल म्हणून भारत सरकार व महाराष्ट्र सरकारने ही अट रद्द करावी अशी मागणी नांदेड निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर मार्फत मा.पंतप्रधान व मा.मुख्यमंत्री यांच्याकडे शिवशंकर पाटील कलंबरकर यांनी निवेदनातून केली आहे.

# लोकसभेसाठी २१३९ मतदान केंद्रावर २० लाख ४ हजार मतदार करणार मतदान

धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) - ४० उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघासाठी निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली असून आचार संहिता लागू झाली आहे. या लोकसभेसाठी २ हजार १३९ मतदान केंद्राद्वारे धाराशिव जिल्ह्यासह औसा व बार्शी तालुक्यातील २० लाख ४२ हजार २८८ मतदार करणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ सचिन ओंबासे यांनी दि.१६ मार्च रोजी दिली. दरम्यान, या मतदारसंघात अनुचित प्रकार रोखण्यासाठी ४० बैठे पथके तैनात करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात लोकसभा निवडणुकी संदर्भात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ मैनक घोष, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, उपजिल्हाधिकारी शिवाजी शिंदे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिरीष यादव आदी उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ ओंबासे म्हणाले की, उस्मानाबाद लोकसभा मतदार संघामध्ये औसा, उमरगा, तुळजापूर, उस्मानाबाद, परंडा व बार्शी या ६ विधानसभा मतदारसंघाचा समावेश करण्यात आलेला आहे. यासाठी औसा मतदार संघासाठी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यांचे नाव, कार्यालयीन दूरध्वनी, मोबाईल क्रमांक पुढीलप्रमाणे - औसा- अविनाश कोरडे, उपविभागीय अधिकारी (०२३८२-२५१३१७, ७३८७०६०४६३), उमरगा - गणेश पवार, उमरगा उपविभागीय अधिकारी (०२४७५-२५१२५१, ९६६५६०८०३३), तुळजापूर - संजयकुमार ढवळे, उपविभागीय अधिकारी, धाराशिव (०२४७१-२४२०२७, ९७६६०४५११५), उस्मानाबाद - संजय पाटील, उपविभागीय अधिकारी, कळंब (०२४७२-२२४५४६, ९६२३३२३७३२), परंडा - वैशाली पाटील उपविभागीय अधिकारी, भूम (०२४७८-२७२००६) व बार्शी - प्रमोद गायकवाड विशेष भूसंपादन अधिकारी, सोलापूर (९८६०२५८९३२) यांचा समावेश करण्यात आला आहे. तर दि. १२ ते १९ एप्रिलपर्यंत उमेदवारांना आपले उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. तर दि.२० एप्रिल रोजी अर्जांची छाननी करण्यात येणार असून २२ एप्रिल रोजी अर्ज मागे घेता येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच २५८ झोनल बीएलओंची नियुक्ती केली असून १० हजार २६६ मनुष्यबळांची आवश्यकता लागणार असल्याचे त्यांनी नमूद केले. तर मतदानासाठी बीयु- २३५४, सीयु- २३५४ व व्हीव्हीपॅट २४५४ ईव्हीएम-व्हीव्हीपॅट राखीवसह उपलब्ध करण्यात येणार आहेत. तसेच २४६ झोनसाठी २२९ बसेस व ३१२ जीप आधी वाहनांची व्यवस्था करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. दि.२३ जानेवारी २०२४ नुसार १० लाख ५८ हजार १५४ पुरुष तर ९ लाख ४६ हजार ५४ महिला व इतर ७८ मतदान यासाठी पात्र असून आणखी नवीन नोंदणी करणाऱ्या मतदारांची संख्या वाढू शकते असे त्यांनी सांगितले. दिव्यांगासाठी विशेष मतदान केंद्राची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. यामध्ये सखी - ६, दिव्या - ६, पडदानशीन - २०१, क्रिटिकल - ८, युवा- १० व मॉडेल मतदान केंद्र ५४ आहेत.

सर्विस मतदार संख्या ३८०४ असून यामध्ये ८६ महिला तर ३७१८ पुरुषांचा समावेश आहे. तर ग्रामीण भागात १७७४ तर शहरी भागात ३६५ मतदान केंद्रांचा समावेश आहे. तसेच ८५ वर्षापेक्षा जास्त वय असलेले मतदार ३५ हजार ७५४ मतदार आहेत. यामध्ये १५ हजार ८४३ पुरुष व १९९११ महिला मतदारांचा समावेश आहे. तर १९८०३ पीडब्ल्यूडी इलेक्ट्रोल मतदार असून १२८७४ पुरुष व ६९२८ महिला मतदारांचा समावेश आहे.

# चिंच फोडण्याच्या व्यावसायातून महिलांना मिळतोय रोजगार

## सुटीच्या दिवशी शालेय विद्यार्थीही करतात वाडवडीलांना मदत

शिरूरआनंतपाळ : ग्रामीण भागात उन्हाळ्याच्या दिवसामध्ये चिंचचा व्यवसाय जोरात चालत असल्याने शाळकरी मुल मुली तसेच महिलांना रोजगार मिळत आहे. चिंच व्यवसाय करण्याकडे ग्रामीण भागातील लोकांचा कल वाढला आहे. शिरूरआनंतपाळ तालुक्यातील येरोळ व परिसरात मोठ्या प्रमाणात चिंचचा व्यवसाय सुरू आहे.

या व्यावसायातुन येरोळ गावातील पाचशे महिलासह दहावी बारावी परिक्षा संपलेल्या व शाळकरी मुला मुलींना रोजगार मिळवून दिला आहे. तोंडाला पाणी सोडणारी चिंच ही सामान्य वस्तू वाटत असली तरी तिच्या उपयोगीतेमुळे चिंचचा व्यावसाय वाढण्यास कारणीभूत ठरली आहे. दक्षिण भारतात चिंचेची मागणी अधिक असल्याने ग्रामीण भागातून तिचे उत्पादन वाढू लागले आहे. ग्रामिण भागामध्ये वाडवडीलांनी पन्नास वर्षापुर्वी लावलेली चिंचची मोठमोठी झाडे या परिसरात आहेत. चिंचच्या एका झाडापासून वर्षानोवर्ष मोठ्या प्रमाणात चिंचचे उत्पादन मिळते. विशेषत फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, मे या चार महिन्यात चिंचचे उत्पादन घेतले जाते. येथील चिंच व्यापारी हाबीब पठाण यांनी काही शेतकऱ्यांचे चिंचचे झाड खरेदी करून चिंचचा व्यवसाय सुरू केला आहे. चिंच फोडण्यासाठी वयोवृध्द महिला पुरुष व शाळा सुटीच्या दिवशी शाळकरी मुल मुली आई वडीलांना चिंचा फोडण्यासाठी मदत करत आहेत. चिंच फोडण्याचे कार्य किमान दोन ते अडीच महिने चालते. एका किलो मागे ८ ते १० रुपये किलो मजूरी मिळते. जर एका दिवशी एक महिला १० किलो चिंच फोडण्याचे कार्य करीत असेल तर १०० रुपये मजूरी मिळते. चिंच फोडणे सोपे कार्य असल्याने सुट्टीच्या दिवसात शाळकरी मुल मुलीसुध्दा एक ते दीड महिने मजूरी मिळवून आपल्या शिक्षणासाठी हातभार लावतात. त्यामुळे सदर व्यवसाय हा महिलांसाठी फायदेकारक मानला जात आहे. ग्रामिण भागात हा व्यावसाय लहान वाटत असला तरी काही काळानंतर हाच व्यवसाय मोठा रूप धारण केल्याशिवाय राहणार नाही. कारण लाखो रुपयाची उलाढाल या व्यवसायातून होत असून चिंच जरी आंबट असली तरी व्यवसाय मात्र लाखो रुपये मिळत असल्याने आंबट चिंच गोड वाटत आहे.

### अशी होते प्रक्रिया...

चिंचा पूर्ण पिकल्यावर त्या झाडावरून काढतात. एकत्र करून पोत्यात भरतात. मजुरांकरवी चिंचेवरील टरफल काढले जाते. गरातील चिंचोकेही काढले जातात. त्यानंतर गरात मीठ मिसळून त्याचे लहान, लहान गोळे केले जातात. सिरफ, रसाचा अर्क, रस व थंड पेय यासाठी त्याचा गरजेनुसार उपयोग करता येतो. चिंचेच्या गरापासून चिंच पावडरही बनवली जाते.

### असा ठरतो दर...

चिंचेच्या फळामध्ये विविध जातीचे वान प्रकार आहेत. काही चिंचा सरळ फुगीर असतात. त्यात बिया अधिक असतात. फुगीर व वाकड्या चिंचात गर अधिक असतो. काही फळे सरळ व चपटी असतात तर काही वाकडी असतात. चिंचेची लांबी, गर व बियांचे वजन, त्यांची जाडी, फायबरचे प्रमाण यावर व्यापाऱ्यांकडून चिंचांचा दर ठरवला जातो.

### चिंचेची विविध वाणं

चिंच कुळात एकूण २४ उपजाती आहेत. त्यामध्ये योगेश्वरी, अजंठा, थायलंड अशा जाती आहेत. मराठवाडा कृषी विद्यापीठाने प्रतिष्ठान नावाची चिंचेची जात शोधली आहे.



### एका झाडापासून मिळणारे उत्पन्न

चिंचेचे झाड १३-१४ वर्षांचे झाल्यानंतर उत्पन्न द्यायला सुरुवात करते. एका वाढलेल्या झाडापासून दरवर्षी १५० ते ३०० किलो चिंचा मिळतात. ज्याप्रमाणे झाडाची वाढ होत जाईल. त्याप्रमाणे उत्पन्न वाढत जाते. लातुर आडत लाईन मध्ये सध्या चिंचला क्विंटलचा दर नऊ हजार ते बारा हजार रुपये प्रति क्विंटल खरेदी केले जात असल्याचे व्यापारी कचरु मद्रेवार यांनी सांगितले. सरासरी एक झाड वर्षाला आठ ते दहा हजार रुपयांचे उत्पन्न देते. अगदी १०० वर्षांपर्यंत हे झाड उत्पन्न देत असल्याचे आटोळा येथील वयोवृध्द शेतकरी बापुराव लोहारे यांनी सांगितले .

# यशवंत धाराशिव जिल्हा

रविवार दि. १७ मार्च २०२४

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane@gmail.com




## मानधन वाढविल्याबद्दल पोलीस पाटील संघाच्यावतीने काळे यांचा सत्कार



धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) – गाव पातळीवर जनता व शासन यांच्यातील दुवा म्हणून काम करणाऱ्या तसेच गावातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून तुटपुंज्या मानधनावर काम करणाऱ्या पोलीस पाटलांच्या मानधनात महायुती सरकारने भरघोस वाढ केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाच्यावतीने धाराशिव लोकसभा निवडणूक प्रमुख नितीन काळे यांचा दि.१४ मार्च रोजी सत्कार करण्यात आला.

धाराशिव येथील प्रतिष्ठान भवनमध्ये सत्कार करण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस व अजित यांचे आभार व्यक्त केले. तसेच पोलीस पाटलांच्या मानधनाच्या आतापर्यंतच्या लढ्यामध्ये अखंड साथ देवून तो यशस्वी करण्यासाठी आ राणाजगजिसिंह पाटील यांनी सतत पाठपुरावा केला. पोलीस पाटील यांचे १५ हजार रुपये मानधन झाले आह

# जिल्हा रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालय या आरोग्य मंदिरांचा कायापालट करण्यास प्राधान्य- मुख्यमंत्री शिंदे

## धाराशिव येथील ५०० खाटांच्या जिल्हा रुग्णालयाचे ऑनलाईन भूमिपूजन

## पालकमंत्री प्रा. डॉ. सावंत यांच्या वाढदिवसाची जिल्ह्यासाठी भेट





धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) – राज्य शासनाने ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा बळकट करण्यास प्राधान्य दिले आहे. राज्यातील जिल्हा रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालये यांचा कायापालट करण्यात येणार असून या ठिकाणी दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देऊन आरोग्य सेवेची ही मंदिरे अधिक सुसज्ज केली जातील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दि.१५ मार्च रोजी केले. दरम्यान पालकमंत्री प्रा डॉ तानाजीराव सावंत यांनी या रुग्णालयाच्या भूमिपूजनाचे करून त्यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्ह्यासाठी एक प्रकारे भेटच दिले आहे. तसेच मुख्यमंत्र्यांनी माझ्या वाढदिवसानिमित्त राईट टू हेल्थ हा कायदा आणून मला भेट द्यावी अशी मागणी मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे केली. तर शिंदे यांनी कॅबिनेट बैठकीमध्ये यावर चर्चा करुन सकारात्मक निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन दिले.

सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत धाराशिव येथे उभारण्यात येणाऱ्या नवीन ५०० खाटांच्या जिल्हा रुग्णालयाच्या इमारतीचे भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले.

मुख्यमंत्री शिंदे यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी झालेल्या कार्यक्रमास सार्वजनिक आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत (दूरदृश्य प्रणालीद्वारे), राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, आ मंदा म्हात्रे, आ मनीषा कायंदे, आ राजेश पवार, आ बालाजी कल्याणकर, माजी आमदर रामदास कदम, सार्वजनिक आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर (दूरदृश्य प्रणालीद्वारे), आरोग्य सचिव नवीन सोना, आयुक्त धीरजकुमार, आरोग्य सेवा संचालक डॉ. नितीन आंबाडेकर तर धाराशिव येथील भूमिपूजन कार्यक्रम स्थळावरून मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.प्रविणसिंह परदेशी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनक घोष, आरोग्य विभागाच्या लातूर परीमंडळाच्या उपसंचालक डॉ.अर्चना भोसले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बाबासाहेब थोरात, कार्यकारी अभियंता नरसिंग भांडे, प्रभारी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.इस्माईल मुल्ला, जिल्हा आरोग्य अधिकारी व शिवसेना सहजिल्हाप्रमुख अनिल खोचरे आदी उपस्थित होते.

गेल्या २ वर्षांपासून मी महिला बचत गट, जिल्हाधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी व त्यांच्यासोबत असणाऱ्या यंत्रणाच्या सोबत काम करीत आहे. आशा स्वयंसेविकांच्या माध्यमातून जिल्ह्यातील १ लाख २५ हजार महिलांची आरोग्य तपासणी केली. त्यामध्ये ३६६ गर्भाशय, चेस्ट व ओरल कॅन्सरचे संशयित रुग्ण आढळले. त्याचे खात्रीशीर निदान करण्यासाठी जिल्ह्यात सुविधा नसल्यामुळे बार्शी किंवा सोलापूरला त्यांना पाठवावे लागत होते. त्यामुळे मुख्यमंत्री शिंदे व आरोग्यमंत्री सावंत यांच्यासोबत बैठक घेतली. शिंदे यांनी प्रत्येक जिल्ह्याला एक स्वतंत्र जिल्हा रुग्णालय असावे अशीसूचना दिली. त्यामुळे एशियन विकास बँकेच्या माध्यमातून यासाठी निधी मिळवण्यासाठी मी प्रयत्न केले. मात्र या बँकेकडे वैद्यकीय महाविद्यालयचा कार्यक्रम आहे. परंतु त्याच पॉलिसीच्या आधारे पंधराशे कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला असून या माध्यमातून धाराशिव येतील जिल्हा रुग्णालय उभा करण्यात येत आहे विशेष म्हणजे मंत्री सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त हा चांगला कार्यक्रम असून या ठिकाणी आरोग्य अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी निवासाची सुविधा करण्यात येणार असल्याचे मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ प्रवीणसिंह परदेशी यांनी सांगितले.

मुख्यमंत्री शिंदे यांनी मंत्री डॉ. तानाजी सावंत यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन धाराशिव जिल्ह्यात होत असलेल्या सुसज्ज ५०० खाटांच्या रुग्णालयाबद्दल त्यांचे अभिनंदन केले. तर सर्व सामान्यांना दर्जेदार आणि कमी खर्चात आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी राज्य शासनाने प्राधान्य दिले असल्याचे त्यांनी सांगितले. आरोग्य विभागाला यासाठी आवश्यक निधी व यंत्र सामग्री उपलब्ध करून दिली जात आहे. राज्यात वैद्यकीय महाविद्यालयांसोबतच स्वतंत्र सुपर स्पेशालिटी सिव्हिल हॉस्पिटल सुरू करण्याचा निर्णय घेतला असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नमूद केले. तसेच आमचे शासन हे दिलेला शब्द पाळणारे शासन असून धाराशिव येथे उभारण्यात येत असलेले ५०० खाटांचे जिल्हा रुग्णालय हे त्याचेच एक उदाहरण आहे. शासनाने महात्मा फुले जन आरोग्य योजनेत दीड लाखाहून पाच लाखापर्यंत उपचाराच्या खर्चास मान्यता दिली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुरु केलेल्या आयुष्यमान भारत योजना व राज्य शासनाच्या महात्मा फुले जन आरोग्य योजना यामुळे सर्वसामान्यांना वैद्यकीय सेवा विनासायास उपलब्ध होत असल्याचे त्यांनी सांगितले. तर मुख्यमंत्री सहायता निधीतूनही गेल्या दीड वर्षात सुमारे २०० कोटीपर्यंत मदत दिली असल्याचे सांगून ते म्हणाले की, सर्वसामान्यांच्या आरोग्यासाठी राज्यात ७०० ठिकाणी बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरु करण्यात येत असून जवळपास ३०० ठिकाणी हे दवाखाने सुरु झाले आहेत. आता कॅशलेस वैद्यकीय सेवा ही सुरु करत असल्याचे त्यांनी नमूद केले. तर सांगली व सातारा जिल्ह्यात स्मार्ट पीएचसी सारखा उपक्रम राबविला जात आहे. अशा उपक्रमातून सर्वसामान्यांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळत आहेत. धाराशिव येथे उभारण्यात येत असलेल्या या रुग्णालयाचा औसा, उमरगा, बार्शी व परंडा या भागातील जनतेस लाभ होणार असून या ठिकाणी वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना याचा लाभ होईल असे त्यांनी नमूद केले. तसेच आरोग्य मंत्री तथा पालकमंत्री डॉ. सावंत म्हणाले की, राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आरोग्य विभाग नेहमीच दक्ष आहे. धाराशिव जिल्हा हा आकांक्षित जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यात होत असलेल्या या जिल्हा रुग्णालयामुळे या भागातील जनतेला चांगल्या व दर्जेदार आरोग्य सुविधा मिळतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जनतेला आरोग्य सुविधा उपलब्ध करायचे असतात त्यासाठी इच्छाशक्ती असणे आवश्यक असते प्रवीण सिंह परदेशी यांनी यासाठी विशेष प्रयत्न केले असल्याचे पालकमंत्री प्रा डॉ सावंत यांनी सांगितले. तर ३१ दिवसांमध्ये यासाठी सर्व आराखडा करून तो मंजूर होऊन आज त्याचे भूमिपूजन होत असल्याचा मला आनंद होत आहे. विशेष म्हणजे वैद्यकीय महाविद्यालयासाठी आवश्यक सुविधा मिळण्यास यामुळे नक्कीच फायदा होणार आहे. राज्यात नवीन दहा जिल्हा रुग्णालय होत असून पहिला मान धाराशिव जिल्ह्याला मिळाल्याबद्दल मुख्यमंत्री शिंदे यांचे आभार व्यक्त केले. हे रुग्णालय अडीच वर्षांमध्ये पूर्ण व्हायला पाहिजे असे सांगत आरोग्यासह शिक्षण व इतर अत्यावश्यक बाबींना प्राधान्य देऊन विकास करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जातीने लक्ष घालून विकासाची गंगा घरापर्यंत आणली असे नमूद करीत कृष्णा भीमा स्त्रीकरण योजनेला गती देऊन वाटर ग्रीडला देखील पुन्हा नव्याने मंजुरी दिल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले.

विशेष म्हणजे लिंग गुणोत्तर देशामध्ये १ हजार मुलामागे ९२९ तर महाराष्ट्रात ९१३ मुलींचे प्रमाण आहे. हा आकडा आपणास खेदजनक असून हे प्रमाण वाणवायचे आणायचे असेल तर ग्रामीण भागातील महिलांना आशा स्वयंसेविकांच्या माध्यमातून घरोघरी जाऊन समुपदेशन करावे लागेल असे त्यांनी सांगितले. जर या पद्धतीने समुपदेशन केले तर पुढच्या तीन वर्षात लिंग गुणोत्तराचे प्रमाण मध्ये महाराष्ट्र अग्रेसर राहील असे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे हे रुग्णालय लवकरात लवकर सर्व सार्वजनिक सुविधा जनतेला मिळतील यासाठी सुपूर्द करू असे आश्वासन त्यांनी दिले.

तसेच राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आरोग्य विभाग नेहमीच दक्ष आहे. धाराशिव जिल्हा हा आकांक्षित जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यात होत असलेल्या या जिल्हा रुग्णालयामुळे या भागातील जनतेला चांगल्या व दर्जेदार आरोग्य सुविधा मिळतील असा विश्वास मंत्री सावंत यांनी व्यक्त केला.

जागतिक बँकेने राज्यातील रुग्णालयासाठी ३ हजार कोटी रुपयांचे कर्ज घेतले आहे. या निधीमधूनच हे रुग्णालय उभे राहत आहे. विशेष म्हणजे जागतिक बँकेचे कर्ज झाल्याबरोबर धाराशिव येथील जिल्हा रुग्णालयास मान्यता मिळाली, निधी मिळाला व टेंडर प्रक्रिया पूर्ण होऊन त्याचे भूमिपूजन झाले. अशा प्रकारे हे रुग्णालय राज्यातील पहिले आहे. याचा फायदा जिल्हा मराठवाडा व कर्नाटक राज्यातील रुग्णांना होईल असे शिवसेना नेते अनिल खोचरे यांनी सांगितले.

आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर म्हणाले की, राज्यात १० जिल्ह्यात सुसज्ज रुग्णालये बांधण्यात येत आहेत. ३६२ कोटी रुपयांचा निधी डॉ. परदेशी यांनी एशियन विकास बँकेकडून या रुग्णालयाच्या बांधकामासाठी उपलब्ध करून दिला असल्याचे सांगितले.

## मंत्री प्रा डॉ सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त १०१ रक्तदात्यांनी केले रक्तदान



परंडा दि.१६ (प्रतिनिधी) – राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री तथा पालकमंत्री प्रा डॉ. तानाजीराव सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात १०१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

परंडा तालुक्यातील सोनारी येथील भैरवनाथ कारखाना स्थळी आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन शिवसेना युवा नेते सोहम सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जनरल मॅनेजर प्रल्हाद ठोंबरे, राजेंद्र कुमार काळे, चीफ अकाऊंटंट गोविंद कुलकर्णी, शेती अधिकारी भगवान काळे, मुख्य अभियंता रविकांत सिंग, मच्छिंद्र थिटे, सिव्हिल इंजिनिअर गुरुराज पाटील, भैरु गरदाडे, अशोक हांगे, राहुल चव्हाण, भारत कवले, राजाभाऊ सूर्यवंशी, परमेश्वर घळके, संतोष पाटील, बाबा भुई, औदुबरं गाडे, सुरेश साळुंखे, सोमनाथ सुर्यवंशी, अतुल देशमुख, बाबासाहेब बाळगूडे, आकाश राशीनकर, महादेव मुळीक, संदीप कवठे, बाळासाहेब धुमाळ, रणजित जगताप, हनुमंत ननवरे, तुषार चव्हाण, संतोष मिस्किन, आण्णा सूर्यवंशी, संतोष सोनवने, प्राणजित गवंडी, सतीश विद्यागर, रामचंद्र गवळी आदी उपस्थित होते. या शिबिराच्या यशस्वितेसाठी सुभाष भोसले, भगवंत रक्तपेढीचे जनसंपर्क अधिकारी गणेश जगदाळे, विजय तोडकरी, राधिका बेले, प्रणाली घोंगाने यांच्यासह स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. शिबिर स्थळी कारखाना प्रशासनाकडून अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी सोहम सावंत यांच्या हस्ते शिबिरामध्ये सहभागी झालेल्या रक्तदात्यांना आकर्षक भेटवस्तू देण्यात आल्या.

## आरोग्यमंत्री डॉ. सावंत यांच्या वाढदिवसानिमीत्त रुग्णांना फळांचे वाटप

परंडा दि.१६ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री तथा पालकमंत्री प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णांना फळांचे वाटप दि.१५ मार्च रोजी करण्यात आले.





परंडा येथील उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप करताना शिवसेना तालुका संघटक तथा संजय गांधी निराधार समितीचे अध्यक्ष जयदेव गोफणे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख बालाजी नेटके, नेत्र विभागाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. गजानन शेटे, डॉ. आनंद मोरे, डॉ. शिंदे, डॉ. पवार, डॉ. अबरार पठाण, लोणी सर्कल आरोग्य मित्र गणेश कोकाटे, कलावंत जिल्हाध्यक्ष नागेश मांजरे महाराज, येणेगाव ग्रामपंचायत सदस्य शहाजी नाईकनवरे, विष्णू सांगडे, संतोष जहागिरदार, संजय गांधी निराधार समिती सदस्य गुलाबराव शिंदे, दहिटना–बोडका सरपंच विठ्ठल करडे, आप्पा कारंडे, बिरमल नाईकनवरे, रामा देशमुख, शिवसेनेचे परंडा सोशल मिडीया तालुका प्रमुख शहाजी ढोरे पाटील आदी उपस्थित होते.

## शासनाने जाहिराती देताना दैनिकाप्रमाणे साप्ताहिकांना देण्यात याव्यात

धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) – माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडून वृत्तपत्रांना देण्यात येणाऱ्या विकसित भारत, विकसित महाराष्ट्र या स्वरूपाच्या दर्शनी जाहिरात जिल्हा दैनिकांप्रमाणे साप्ताहिक वृत्तपत्रांना देण्यात याव्यात अशी मागणी व्हाइस ऑफ मीडियाच्यावतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत एका निवेदनाद्वारे दि.१५ मार्च रोजी केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, दि.६, ७ व ८ मार्च रोजी संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्हा दैनिक वृत्तपत्रांना विकसित भारत व विकसित महाराष्ट्रच्या दर्शनी जाहिरात वितरित करण्यात आलेल्या आहेत. परंतू या जाहिराती वाटपात महाराष्ट्रातील साप्ताहिकांना डावलण्यात आले आहे. विकासात्मक धोरणाच्या जाहिराती देताना सर्व वृत्तपत्रांना समान जाहिराती वाटप व्हायला पाहिजे, असे धोरण महाराष्ट्र शासनाने राबवावे. त्यामुळे लघु वृत्तपत्रांवर अन्याय होणार नाही. या माध्यमातून महाराष्ट्र शासनाच्या विकासाला वृत्तपत्रांच्या माध्यमातून जनसामान्यांपर्यंत शासनाच्या योजना व्यापक प्रमाणात पोहोचवता येतील. त्यामुळे महाराष्ट्रातील व जिल्ह्यातील साप्ताहिक वृत्तपत्रांना या योजनांची जाहिरात देण्यात यावी. विशेष म्हणजे

साप्ताहिक हा शेवटच्या घटकापर्यंत जाऊन पोहोचणारा



दुवा म्हणून काम करीत आहे. तसेच शासकीय योजना, चांगुलपणाचे अनेक विषय साप्ताहिकच लोकांपर्यंत पोहोचवतात. मात्र त्याच साप्ताहिकांना डावलण्याचे काम सतत होत आहे. तर उत्तम बातम्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचे माध्यम हे साप्ताहिक आहे. त्याच पद्धतीने आपल्या जाहिरातीच्या माध्यमातून लोकांपर्यंत जाण्याचा निरोप साप्ताहिकवालेच उतम पद्धतीने करतात. त्यामुळे मागे झालेल्या अभियानात या जाहिराती देण्यात याव्यात. तसेच पुढच्या सर्व अभियान, उपक्रमाच्या जाहिरातीमध्ये साप्ताहिक वृत्तपत्रांना डावलण्यात येऊ नये. हा एकच विषय नाही. तर यापूर्वीच्या अनेक विषयांमध्ये साप्ताहिकाला डावलण्याचे काम होते. त्यामुळे साप्ताहिकांना न्याय देण्याची भूमिका घ्यावी. तर आपण जाहिराती का दिल्या नाहीत ? यापुढे जाहिराती देणार तर कशा देणार ? याबाबत स्पष्टीकरण देणारे पत्र काढून न्याय द्यावा. जर तसे पत्र काढले नाही तर आम्हाला नाईलाजास्तव राज्यातल्या प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालय, माहिती कार्यालय व मंत्रालयासमोर उपोषण करावी लागेल असा इशारा दिला आहे. यावेळी व्हॉइस ऑफ मीडियाचे जिल्हाध्यक्ष हुंकार बनसोडे, साप्ताहिकचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग मते, धाराशिव तालुकाध्यक्ष अमजद सय्यद, डिजिटल विंगचे जिल्हाध्यक्ष वैभव पारवे, कुंदन शिंदे, शितल वाघमारे, राजेश बिराजदार, जफरुद्दीन शेख, शाहरुख सय्यद, किरण कांबळे, मुस्तफा पठाण, शांतीलाल शहा, सलीम पठाण, शरद अडसूळ आदींच्या सह्या आहेत.

## विविध प्रवर्गातील लाभार्थ्यांना दिली योजनांची माहिती

धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) – इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या माध्यमातून इतर मागास विमुक्त जाती,भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती १४ मार्च रोजी देण्यात आली.

धाराशिव शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनमध्ये पृथ्वी इनोव्हेशन ऍन्ड पिक्चर्स एजन्सीमार्फत आयोजित कार्यक्रमातून देण्यात आली. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून लातूर येथील इतर मागास बहुजन कल्याण प्रादेशिक विभाग लातूरचे प्रादेशिक उपसंचालक दिलीपकुमार राठोड होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक बाबासाहेब अरवत,आश्रमशाळा स्कुल बावीचे सचिव दयानंद मनोहर राठोड, आश्रमशाळा संकुल शिंगोलीचे सचिव श्री.आण्णासाहेब चव्हाण व पृथ्वी इनोव्हेशन न्ड पिक्चर्स एजन्सीचे



कार्यवाहक उपस्थित होते.

दिलीपकुमार राठोड यांनी विभागामार्फत ढंराबविण्यात येणाऱ्या ३२ योजनाची माहिती उपस्थितांना दिली. तसेच बाबासाहेब अरवत यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थ्यांनी अर्ज करावेत असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमासाठी जिल्ह्यातील जवळपास २५० ते ३०० नागरिक उपस्थित होते. प्रास्ताविक आश्रमशाळा बावीचे मुख्याध्यापक बळीराम जगताप यांनी केले.आभार इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे निरिक्षक युवराज भोसले यांनी मानले.

# संपादकीय

## संशयास्पद निवड

निवडणूक आयोगामधील रिकामी झालेली दोन्ही पदे आता निवड समितीच्या मान्यतेने भरण्यात आल्याने आगामी लोकसभेच्या निवडणुकांची घोषणा केव्हाही होऊ शकते, त्याचप्रमाणे निवडणुकीची आचारसंहिताही लागू होऊ शकते.

गेल्याच आठवड्यात निवडणूक आयुक्त अरूण गोयल यांनी राजीनामा दिल्यानंतर पंतप्रधान मोदी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने दोन नव्या निवडणूक आयुक्तांची नियुक्ती केली. आयोगातील एक पद आधीच रिक्त होते, त्यातच गोयल यांनी राजीनामा दिल्याने नव्या आयुक्तांची नेमणूक तातडीने करण्यात आली. लोकसभेच्या निवडणुका तोंडावर आल्या हेही त्यामागचे कारण आहे. माजी निवृत्त सनदी अधिकारी सुखवीर संधू आणि ज्ञानेश कुमार यांची नियुक्ती त्रिसदस्तीय समितीने केली. या समितीमध्ये पंतप्रधान मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि विरोधी पक्षनेते अधीर रंजन चौधरी यांचा समावेश होता. या नेमणुकीनंतर अधीर रंजन चौधरी यांनी निवड प्रक्रियेबद्दल जो खुलासा केला त्यावरून या नेमणुका संशयास्पद वाटू शकतात. या पदासाठी दोनशेपेक्षा जास्त नावे दाखल झाली होती. त्या नावांची यादी आपल्याला आदल्या दिवशी मिळाली. एका दिवसात एवढ्या नावांची छाननी आपण करू शकत नव्हतो. बैठकीआधी जी दहा नावे सुचवण्यात आली त्यातून या दोघांची नियुक्ती करण्यात आली. अर्थात निवड समितीत मोदी आणि शहा यांचे बहुमत असल्याने चौधरी यांच्या विरोधाला किंवा आक्षेपाला काही अर्थच नव्हता. म्हणजेच मोदी, शहा यांना हव्या असलेल्या अधिकाऱ्यांचीच नेमणूक झाली. किंबहुना ही निवड आधीच ठरवून केली असावी असेच दिसते. निवडणूक आयुक्तांच्या निवडीच्या प्रक्रियेबद्दल आक्षेप घेणारे अर्ज सर्वोच्च न्यायालयात याआधी दाखल झाले होते. त्यावर निर्णय देताना सर्वोच्च न्यायालयाने गेल्या वर्षी मार्चमध्ये मुख्य निवडणूक आयुक्त आणि त्यांचे दोन सहकारी आयुक्त यांच्या नेमणुका पंतप्रधान, विरोधी पक्षनेता, किंवा लोकसभेतील सर्वांत मोठ्या पक्षाचा नेता आणि सरन्यायाधीश यांच्या समितीने करावे, असा निकाल दिला होता. मात्र निवड समितीत सरन्यायाधीशांची अडचण' नको म्हणून मोदी सरकारने संबंधित कायद्यात दुरुस्ती करून सरन्यायाधीशांना त्यातून वगळले आणि निवड समितीत आणखी एका केंद्रीय मंत्र्याचा समावेश केला. माजी निवडणूक आयुक्त अरूण गोयल हे आधी अवजड उद्योग खात्याचे सचिव होते. अचानक सेवानिवृत्ती घेतल्यानंतर अवघ्या चोवीस तास-ात निवडणूक आयोगाचे सदस्य म्हणून त्यांची वर्णी लागली होती. त्यांची एवढ्या तडकाफडकी महत्त्वाच्या पदावर नियुक्ती झाल्यामुळे संशयाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळेच एकूणच निवडणूक आयोगाच्या नेमणूक आणि निवड प्रक्रियेला न्यायालयात आव्हान दिले गेले होते. सीबीआय, ईडी यांसारख्या केंद्रीय तपास यंत्रणांचा विरोधी पक्षांच्या नेत्यांच्या विरोधात केंद्र सरकार गैरवापर करीत असल्याची टीका होत असताना आपल्या मर्जीतील अधिकाऱ्याची निवडणूक आयोगात सरकार वर्णी लावत आहे का, हा संशय घाईघाईने केल्या गेलेल्या नियुक्तीमुळे अधिकच बळावतो.

आज निवडणुकांची घोषणा

अरूण गोयल यांनी अचानक राजीनामा दिल्यानंतर आयोगातील दोन रिकाम्या जागा भरण्यासाठी सरकारने धावपळ सुरू केली. या नियुक्तीमुळे आता लोकसभा निवडणूक प्रक्रियेचा मार्ग मोकळा झाला आहे. निवडणुकीचा कार्यक्रम आज जाहीर होणार आहे. देशात पारदर्शकपणे निवडणुका पार पडणे अपेक्षित आहे. त्यादृष्टीने निवडणूक आयोगाची भूमिका निष्पक्षपाती व तटस्थ असणे आवश्यक आहे. देशातील निवडणुका पार पाडणे आणि निवडणुकांवर देखरेख नियंत्रण ठेवणे ही निवडणूक आयुक्तांची जबाबदारी आहे. त्यामुळेच मुख्य निवडणूक आयुक्त व त्यांच्या दोन सहकाऱ्यांची नियुक्ती राष्ट्रपतींनी करावी, असे घटनेत म्हटले आहे. त्यानुसार पंतप्रधान अध्यक्ष असलेल्या मंत्रिमंडळ समितीच्या सल्यानुसार या नेमणुका केल्या जातात. माजी निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन यांच्या कार्यकाळाआधी हा निवडणूक आयोग एक सदस्यीय होता. नंतर तो त्रिसदस्यीय करण्यात आला. निवडणूक आयोगाची भूमिका तटस्थ आणि निपक्षपाती असण्याच्या दृष्टीने मर्जीतील अधिकारी सरकारने नियुक्त करणे योग्य नाही. आयोगाच्या स्वायतत्तेला धक्का लागणार नाही, याची काळजी सगळ्यांनीच घ्यायला हवी.

**ज्यांच्या शोधामुळे जगाची जगण्याची दिशा बदलली असे जागतिक कीर्तीचे थोर शास्त्रज्ञ यांची नवीन अभ्यासू पिढीला माहिती व्हावी व त्याद्वारे प्रेरणा मिळावी या हेतूने संक्षिप्त स्वरुपात दरदिवशी किंवा सोईप्रमाणे एका शास्त्रज्ञांची माहिती आम्ही प्रकाशित करीत आहोत. यासंदर्भात आपली प्रतिक्रिया आपेक्षित आहे.**

– संपादक **यशवंत** लातूर

## अॅलेसांड्रो व्होल्टा ४७



विद्युत दाबाचा शोध लावणारा थोर इटालियन शास्त्रज्ञ अॅलेसांड्रो व्होल्टाचा जन्म १८ फेब्रुवारी १७४५ रोजी इटलीतील कोमो गावात झाला. शालेय व महाविद्यालयीन शिक्षण सुविधा त्याच्या मध्यमवर्गीय कुटुंबामुळे त्याला प्राप्त झाल्या व सतराव्या वर्षीच तो पदवी परीक्षा पास झाला. त्यानंतर मात्र उच्चशिक्षणाची सोय त्या गावात नसल्याने व्होल्टाने सोळा वर्षे शिक्षक म्हणून नोकरी केली.
वयाच्या पस्तीसाव्या वर्षानंतर पॅव्हिया युनिव्हर्सिटीमध्ये फिजिक्स डिपार्टमेंटमध्ये व्होल्टा यांची नियुक्ती करण्यात आली. तेथे त्यांना संशोधन करण्याची परवानगीही देण्यात आली. मग केवळ संशोधनासाठीच त्यांनी आपले आयुष्य झोकून दिले.
स्थिरविद्युतमापनासाठी व अन्य प्रयोगासाठी उपयुक्त ठरेल असे जे उपकरण वापरले जाते ते 'इलेक्ट्रोफोरस' हे व्होल्टांनी तयार केले. सध्या सतत वापरल्या जाणाऱ्या 'कपॅसिटर' च्या बनावटीचा इलेक्ट्रोफोरम हा पाया होय. इलेक्ट्रोफोरम प्लेटमधील अंतर वाढवून व त्यावर विद्युतभार देऊन व्होल्टाने सूक्ष्म संवेदना मोजण्यासाठी उपयुक्त असे उपकरण बनविले, त्यास 'मायक्रो इलेक्ट्रोस्कोप' असे नाव देण्यात आले. अनेक प्रयोग करता करता एकदा त्याने आपल्या जिभेच्या टोकावर एक कथलाची पट्टी टेकविली. नंतर चांदीच्या चमच्याने एक टोक जिभेच्या आतच्या भागावर टेकवलं व दुसरं टोक कथलाच्या पट्टीच्या बाहेरच्या टोकाला लावले, तर त्याने असे अनुभवले की जिभेच्या टोकावर आंबट चव लागून रिवरिवल्यासारखे झाले. यावरून व्होल्टाने निष्कर्ष काढला की विद्युतनिर्मिती दोन असमान धातूंपासून निर्माण झाली. या आपल्या प्रत्यक्ष अनुभवाच्या जोरावर व्होल्टाने गॅल्व्हानीच्या सिद्धांतात दुरुस्ती सुचविली व इलेक्ट्रोकेमिस्ट्री म्हणजेच 'विद्युतरसायन' या शास्त्राचा पाया घातला. यानंतर थोड्याच कालवधीनंतर व्होल्टाने सर्व जगात मान्य झालेला असा 'व्होल्टाझ पाईल' हा सिद्धांत मांडला. लंडनच्या रॉयल सोसायटीने सन १८०० मध्ये या संशोधनास प्रसिद्धी दिली. या यशस्वी संशोधनामुळे पुढे ड्राय सेल्स म्हणजे 'विजेऱ्या' निर्माण झाल्या. अशा बॅटऱ्यांचा उपयोग रेडिओ, ध्वनियंत्रे व अनेक उद्योगधंद्यांमध्ये होऊ लागला. म्हणजेच पुढील शंभर-दीडशे वर्षातील विद्युतसंशोधनाची मुहूर्तमेढच


# राष्ट्र चेतनेचे ऋषी-स्वामी दयानंद सरस्वती

स्वामी दयानंद सरस्वती यांचे दोनशेवे जन्मवर्ष नुकतेच साजरे झाले. गुजरात मधील मोरबी जिल्ह्यातील टंकारा या गावी या दोनशेव्या जयंतीच्या सोहळा झाला. त्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दूरदृश्य प्रणाली द्वारे संबोधित केले होते. त्यात स्वामी दयानंद सरस्वती केवळ वैदिक कृषी नव्हते तर राष्ट्चेतनेचे ऋषी होते असे प्रतिपादन त्यांनी केले.
या दोनशेव्या जन्मादिनाच्या निमित्त स्वामी दयानंद सरस्वती यांचे मूळ विचार नेमकेपणाने समजून घेण्याची गरज आहे. ते म्हणतात ' जो निप:क्षपाती आहे, जो न्याय व समानता शिकवतो, जो विचार -वाणी व कृती यांच्यात सत्यता राखायला शिकवतो त्याला मी धर्म म्हणतो.' स्वामी दयानंद सरस्वती म्हणजे एकोणिसाव्या शतकातील एक प्रमुख धर्म सुधारक होते. इंग्रजी राजवट स्थिरावल्याच्या आणि समाजात वैफल्याचे आणि पराभवाचे समाजकारण प्रस्थापित झाले होते त्या काळात हिंदू धर्मात आणि समाजात सुधारणा करण्यासाठी त्यांनी ' आर्य समाज 'या संस्थेची १० एप्रिल १८७५ रोजी स्थापना केली.' सत्यार्थ प्रकाश 'हा अतिशय महत्त्वाचा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाचा हेतू स्पष्ट करताना त्यांनी म्हटले आहे,' हा ग्रंथ लिहिण्याचा माझा मुख्य उद्देश हाच आहे, की सत्य अर्थाचा प्रकाश करावा. अर्थात जे खरे आहे त्याला सत्य व जे खोटे आहे त्याला असत्य ठरवणे हा माझा मुख्य उद्देश आहे. आणि यालाच मी सत्य अर्थाचा प्रकाश समजत आहे.

**चिकित्सक विचार–**

स्वामी दयानंद सरस्वती यांचा जन्म गुजरात मधील टंकारा या गावी एका ब्राह्मण कुटुंबात १२ फेब्रुवारी १८२४ रोजी झाला. त्यांचे मूळ नाव मूळशंकर होते. तत्कालीन समाज परिस्थितीनुसार त्यांच्या घरचेही वातावरण धार्मिक होते. लहान वयात स्वाभाविकपणे मूर्तीपूजेवर विश्वास होता. पण एकदा शंकराच्या पिंडीवर उंदीर उड्या मारताना पाहून त्यांच्या विचारात चिकित्सा निर्माण झाली. सत्य काय ?हा प्रश्न त्यांना भेडसावू लागला. लग्नाच्या आणि संसाराच्या बंधनात अडकायचे नसल्यामुळे वयाच्या विसाव्या वर्षी ते सत्याच्या शोधासाठी घराबाहेर पडले. देशभर फिरले आणि त्यांनी मथुरा येथील वज्रानंद स्वामी यांचे शिष्यत्व पत्करले आणि अध्ययन सुरू केले.

स्वामी दयानंद सरस्व-तीनी हिंदू धर्मग्रंथांचा, वेदांचा अतिशय सखोल अभ्यास केला. आपल्या वैदिकग्रंथातच सर्व ज्ञानाचा उगम आहे यावर त्यांची श्रद्धा होती. मूर्ती-पूजेत आणि कर्मकांडात रुतलेल्या हिंदू धर्माचे पुनर्जीवन झाले पाहिजे असे ते म्हणत. त्यांच्या मते बुद्धपूर्व काळातील हिंदू धर्मात कर्मकांडाचे स्तोम नव्हते. विषमतेला जोपासणारी जाती व्यवस्था नव्हती. यज्ञात प्राणी हत्या केली जात नव्हती. धार्मिक विधीना उत्सवाचे स्वरूप नव्हते. वैदिकधर्म हे धर्मतत्त्वाचे एक श्रेष्ठ रूप आहे. उच्च धर्माचे ज्ञान वेदातच साठवलेले आहे असे त्यांचे मत होते. त्यांच्या मते जातीव्यवस्था आणि वर्णव्यवस्था ही जन्मावर नाही तर गुणावर, कर्मावर आधारित असते.
ऋषी परंपरेने आलेली ही व्यवस्था अतिशय योग्य आहे. तसेच मूर्ती-पूजा निशिद्ध आहे असे सांगत ते म्हणतात,परमेश्वर सर्वव्यापक असताना त्याची एका वस्तूच्या ठिकाणी भावना ठेवणे हे अज्ञानाचे द्योतक आहे. दगडासारख्या जड वस्तूची पूजा, अभिषेक करून मनुष्याचे ज्ञान कसे वाढेल ?असा खडा सवाल त्यांनी केला. ज्ञानी माणसाच्या संगतीनेच आपले ज्ञान वाढते असे ते म्हणत. तसेच स्त्रियांचा उद्धाराचाही त्यांनी विचार मांडला. दुष्ट रूढी परंपरांनी स्त्री अबला आणि परतंत्र बनवली असून तिचे जीवन करुणास्पद बनवले आहे. धार्मिक व सामाजिक परंपरांनी तिचे जीवन शृंखलाबद्ध केले आहे. त्या शृंखला तोडल्या पाहिजेत असे आनंद सरस्वती म्हणतात.



कर्मकांडाला विरोध-स्वामी दयानंद सरस्वती सामाजिक अवन-तीची मीमांसा करताना म्हणतात,' वेदानंतरच्या काळात हिंदू धर्मात कर्मकांड शिरले. ज्ञानाचे पावित्र्य आणि माणुसकी लोक पावत गेली. जातीभेद वाढत गेले. स्त्रिया आणि दीनदलितांवर अन्याय होऊ लागल. कर्मठपणा वाढला. अस्पृश्यता निर्माण झाली. हिंदू समाज रुढीग्रस्त बनला. धार्मिक कर्मकांडाचे स्तोम माजले. मूर्तीपूजेचे महत्त्व वाढले. समाजाची एकात्मता संपली. आणि त्यामुळे विकास थांबला. त्याचा फायदा भारताबाहेरून आलेल्या शक्तींनी, धर्मप्रसारकांनी घेतला.' स्वामी दयानंद सरस्वती यांनी नामस्मरण आणि जपमाळ यालाही तीव्र विरोध केला. ते म्हणतात की, नुसता मंत्र म्हणून किंवा नाम जपून ईश्वराचा अनुभव येत असला तर ते 'साखर' शब्द पुन्हा पुन्हा म्हणत राहिल्याने तिची गोडी प्रत्यक्ष चाखायला मिळण्यासारखे ठरेल. लाख वेळा साखर हा शब्द उच्चारला तरी त्यामुळे जिभेला जशी तिची गोडी चाखायला मिळत नाही. तसेच केवळ लाखो वेळा देवाचे नाम घेण्याने त्याचा साक्षात्कार होऊ शकत नाही. मंत्र, जपजाप्य, तीर्थयात्रा, पवित्र स्नान, गंध टीळा लावणे, उपवास करणे हा खरा धर्म नाही व त्यातून आध्यात्मिक विकास काडीचाही होत नाही हे सांगितले.

शिक्षण प्रसाराचे कार्य- स्वामी दयानंद सरस्वतीनी जातीभेदाला, कर्मठपणाला विरोध केला. राष्ट्रीय जागृती आणि व्यक्तीचा विकास यासाठी उत्तम धर्माच्या शिक्षणाची आवश्यकता आहे हे ओळखून त्यांनी शिक्षण प्रस-ाराचे कार्य केले. राष्ट्रीय ऐक्य वाढीस लागावे म्हणून हिंदी भाषेचा त्यांनी पुरस्कार केला. 'सत्यार्थ प्रकाश' या ग्रंथात त्यांनी आपले धर्मविचार मांडले आहेत. त्यांच्या मते,' वैदिक धर्मानुसार केलेली धार्मिक कृत्ये व संस्कार साधे असतात. त्यात उधळपट्टी व अवडंबर नसते. वेदांचे अध्ययन करावे, मूर्तिपूजा त्याज्य मानावी, जातीभेदाला स्थान देऊ नये. आश्रमधर्म पाळावा. सतशील संपादन करावे.प्रा.डॉ.ग. ना.जोशी' लिखित ' भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद इतिहास खंड ९ 'या ग्रंथात म्हटले आहे की,' सत्यात असत्य बरेच मिसळलेले असते व असत्यालाच काही लोक सत्य समजतात व सत्य आहे असे भासवतात. त्यात योग्य विश्लेषण करून, विवेक करून, चाळणी लावून व दुराग्रहाला बळी न पडता शुद्ध बुद्धीने जर अर्थ समजला तर तो इतरही बुद्धीने विचार करणाऱ्यांना पटू शकतो व पटवून देता येतो. म्हणून मूळ ग्रंथातील विचारांचाही चिकित्सक व साक्षेपी रीतीने अभ्यास करणे आवश्यक ठरते. सत्यार्थ प्रकाश या ग्रंथात दयानंदानी आणि सत्यासत्यनिर्णय करून स्वतःला निर्दोष वाटणाऱ्या मतांचा पुरस्कार केला. इतरांनी त्याचा स्वीकार करावा अशी इच्छा व्यक्त केली आहे. दयानंदाना इंग्रजी भाषेचे ज्ञान नव्हते व त्यांनी इंग्रजी शिक्षण घेतले नव्हते. पण त्यांना अनुभव ,निरीक्षण, प्रयोग, परीक्षण, बुद्धिनिष्ठ, विकाररहित विश्लेषण या मार्गाने तयार झालेले वैज्ञानिक ज्ञान मान्य होते. तेही स्वतः या पद्धतीचा अवलंब करत. पण त्यांच्या वेदांवरील असामान्य प्रेमामुळे हे सर्व वैज्ञानिक ज्ञान वेदांमध्ये आधीच सांगितलेले आहे असे ते आग्रहाने मांडत.'

समाज सुधारणा

आपल्या शिकवणूकीच्या प्रसार व प्रचारासाठी आणि धर्म आणि समाज सुधारण्याच्या कार्यासाठी स्वामी दयानंद सरस्वतीनी देशभर प्रवास केला, हजारो व्याख्याने दिली. त्यांना अनेक अनुयायी लाभले हे जेवढे खरे तेवढाच त्यांना अनेकांनी विरोधही केला. कारण त्यांचे मूर्ती पूजा विरोधाचे, जातीभेद निर्मूलनाचे, धर्म स्वच्छ करण्याचे विचार कर्मठाना आणि सनातन्याना मानवणारे नव्हते. त्यामुळे त्यांचा जोधपुर मध्ये मृत्यू सुद्धा संशयास्पद रीतीने झाला. त्यांचे विचार न पटणाऱ्यांनी त्यांच्यावर विष प्रयोग केला असावा असे मानले जाते. कर्मठ सनातन्याप्रमाणे ख्रिश्चन व मुस्लिम धर्ममार्तंड यांचाही त्यांना विरोध होता. कारण स्वामी दयानंद सरस्वती त्यांच्या धर्मप्रसार कार्यावर कडक टीका करत. पारतंत्र्याच्या काळात लोकशाही व्यवस्था आणि विकेंद्रित शासन व्यवस्थेचा पुरस्कार त्यांनी केलेला होता. एकोणिसाव्या शतकात धर्मसुधारणा आणि समाज सुधारणा यामध्ये स्वामी दयानंद सर-स्वतीनी जे प्रयत्न केले त्याची दखल पुढील कित्येक पिढ्यांना घ्यावीच लागेल यात शंका नाही.

(लेखक समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजीचे १९८५ पासूनचे कार्यकर्ते आहेत.)

**–भवताल : प्रसाद माधव कुलकर्णी**

## राशी भविष्य



राशी भविष्य
१७ मार्च २०२४ (पीएसआय)
मेष: शुभ रंग:लाल, शुभ दिशा :उत्तर
महिलांनी कौटुंबिक छोट्याशा कारणांमुळे मूड घालवून बसू नका. कामाचे श्रेय न मिळाल्यानेही वाईट वाटेल.
वृषभ : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: पूर्व
कामात केलेल्या सुधारणा आणि नव्या योजना कार्यान्वित करण्यास केलेली जम वाजमव यांचा फायदा पुढे होईल.
मिथुन : शुभ रंग: पिवळा: शुभ दिशा: पूर्व
कोणाशी वादविवाद करणे किंवा कोणाच्या अतिआहारी जाणे टाळायला हवे. मुलांचे नवीन प्रश्न उद्भवतील.
कर्क : शुभ रंग:निळा, शुभ दिशा: पूर्व
आर्थिक व्यवहारात जातीने लक्ष घालणे आवश्यक. वडिलधाऱ्यांची सेवा करावी लागण्याची शक्यता.
सिंह : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:उत्तर
आपले हितसंबंध जपण्यासाठी एखाद्याच्या कार्यक्रमात जाऊन हजेरी लावावी लागेल.
कन्या :शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: पूर्व
युवकांनी कोणत्याही प्रलोभनापासून दूर राहिलेले बरे. महिलांनी कुटुंबात शब्दाने शब्द वाढतो हे लक्षात ठेवा.
तुळ : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पश्चिम
नोकरी-व्यवसायात सध्या पावले उचलणे आवश्यक. कोठेही वादाची ठिणगी पडू देऊ नका.
वृश्चिक : शुभ रंग :जांभळा,शुभ दिशा:दक्षिण
संततीच्या दृष्टीने येणाऱ्या शुभवार्ता अभिमानास्पद ठरतील. धार्मिक विधी केल्यामुळे आनंद मिळेल.
धनु : शुभ रंग: काळा, शुभ दिशा: पश्चिम
मित्र-मैत्रिणीचा किंवा घरातील सदस्यांचा जीवनातला महत्त्वाचा प्रसंग साजरा कराल.
मकर : शुभ रंग:पांढरा,शुभ दिशा: उत्तर
बौद्धिक क्षेत्रात चांगले नाव करता येईल. आर्थिकदृष्ट्या स्वत:च्या मनाप्रमाणे व्यवहार होतील.
कुंभ : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम
शेतकऱ्यांना दिलासा देणाऱ्या घटना घडतील. नशिबाची साथ मोठ्या प्रमाणात मिळेल.
मीन : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: उत्तर
नोकरी-व्यवसायात अनेक संधी मिळणार आहेत. गोड बोलून कार्यभाग साधलेला बरा.
१७ मार्चला जन्मलेल्या लोकांचा भविष्य
स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर सुर्य, नेपच्यून व शनीचा प्रभाव आहे. तुमच्या जीवनात बरेच चढउतार व स्थित्यंतरे होण्याची शक्यता आहे. एकदा एक ध्येय निश्चित केले की चिकाटीने व सातत्याने ते साध्य होईपर्यंत तुम्ही त्याचा पाठपुरावा करता. इतरांच्या खाजगी प्रकरणात उगाच नाक खुपसण्याची तुम्हला सवय नसते. आपण बरे आपले काम बरे अशी तुमची वृत्ती असते. पण वेळप्रसंगी इतरांच्या मदतीला धावून जाण्यात तुम्हाला धन्यता वाटते. आपण केलेल्या त्यागाची प्रसिध्दी तुम्हाला आवडत नाही.
शिस्तीचा अतिरेक टाळा. मनाचा कोतेपणा, संकुचितवृत्ती सोडून द्या. म्हणजे कंजूषपणाचा आरोप होण्याची शक्यता कमी होईल. लोकात मिसळण्याने स्वभावाचे कंगोरेही नाहीसे होतील. व्यक्तीमत्व मनमोकळे बनेल. हाडांचे विकार, संधीवात यापासून काळजी घ्या. कॅल्शियमसाठी आहारात दुधाचा वापर आवश्यक. आंबट पदार्थ, शीतपेये टाळा.
कार्यक्षेत्र : स्वतंत्र व्यवसायापेक्षा तुम्ही नोकरीलाच शक्यतो प्राधान्य द्याल. अशी सुरक्षिता व स्थैर्य तुम्हाला लोखंड, खनिजे, खनिज तेले, बांधकाम साहित्य यांच्या कारखान्यात वा कंपन्यात लाभू शकेल. नोकरीतील पदोन्नती, पगारवाढ धीमेगतीने झाली तरी विश्वासार्हता जास्त राहील. कृषिक्षेत्र, छापखाने, गुन्हेगारीचा शोध, पुराणवस्तू संग्रहालय इ. क्षेत्रातही तुमचे चिकाटीचे कौतुक होईल. धोरण आखण्यासाठी व्यवस्थापानातही सहभाग उचलू शकाल.
प्रणयी जीवन : विवाह उशिरा करण्याकडे तुमचा कल असतो. जीवनात स्थिरस्थावर झाल्याखेरीज सहसा तुम्ही विवाहाचा विचार करीत नाही. जुन्या परंपरा, प्रथा, नीतीमूल्याचे तुम्ही भोक्ते असल्याने स्वैर, स्वच्छंदी, बेतालपणे जगणारी माणसे तुम्हाला आवडत नाहीत. म्हणून २१ एप्रिल ते २० मे दरम्यानच्या व्यक्ती टाळा. जीवन प्रफुल्लित करण्यासाठी जून २१ ते जुलै २० दरम्यानच्या व्यक्ती निवडा.
वर्षफळ : प्रकृत्ती वर्षभर उत्तम साथ देईल. केलेल्या मेहनतीचे चीज रोख आर्थिक लाभाच्या रूपात होईल. फेब्रुवारी मार्च मध्ये आपल्या जमीन जागेतून उत्पन्नाचे साधन उपलब्ध होऊ शकेल. एप्रिल मध्ये भाऊबंदकीचे प्रश्न विकोपाला जातील. मुलांशी मतभेद संभवतात. जुलै मध्ये नव्या निर्मितीत, नव्या योजनात व्यग्र रहाल. ऑक्टोबर नोव्हेंबर मध्ये बाजारातील व्यापारी घडामोडींचा अचूक अंदाज घेऊन शेअरबाजारात फायदा कमावता येईल.
महत्वाचे वर्ष : ८, १७, २६, ३५, ४४, ५३, ६२, ७१.
भाग्यरत्न : निलम
याच तारेखेची व्यक्ती : स्वामी श्रद्धानंद, वा.ना. देशपांडे, पंडित रा.ना. दांडेकर

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# लिंगायत महासंघाच्या कोल्हापूर जिल्हाध्यक्षपदी चंद्रकांत पाटील यांची फेरनिवड



लातूर -लिंगायत महासंघ शाखा कोल्हापूर जिल्ह्याच्या जिल्हाध्यक्षपदी चंद्रकांत पाटील कोल्हापूर यांची निवड आज लातूर येथील हाँटेल मयुर येथे लिंगायत महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रा सुदर्शनराव बिरादार सर यांनी केली.या पुर्वी सुद्धा चंद्रकांत पाटील हे जिल्हाध्यक्ष होते.त्यांचे सामाजिक कार्य व जनसंपर्क पहाता त्यांना बिरादार सरांनी डबल संधी दिली आहे.व में महिन्यात कोल्हापूर येथे लिंगायत महासंघाच्या वतीने मेळावा आयोजित करण्यात येणार असल्याचे चंद्रकांत कालापाटील यांनी सांगितले. लिंगायत महासंघाच्या वतीने चंद्रकांत पाटील यांचा बिरादार सर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.

# गुणवत्तेची प्रेरणा घेऊन यशाची शिखरे सर करा :लाहोटी

लातूर : दि. १५ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ दयानंद शिक्षण संस्था सभागृहात मोठ्या उत्स-ाहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, प्रमुख उपस्थिती दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी, नियामक मंडळ सदस्य दीनानाथ भुतडा, विशाल लाहोटी, डॉ.सुरेश भट्टड, शशिकांत कोटलवार, सागर मंत्री, चैतन्य भार्गव आदि उपस्थित होते. गुणवत्त-ेची प्रेरणा घेऊन यशाची शिखरे सर करा. आपली ध्येये मोठी ठेवा व ती ध्येये साध्य करण्यासाठी अथक प्रयत्न करा. दयानंद शिक्षण संस्था गुणवंत विद्यार्थ्यांचे पालकत्व स्वीकारण्यास सज्ज आहे. आज त्याची रक्कम अकरा लक्ष रुपये असून भविष्यामध्ये ती उत्तरोत्तर वाढत राहील. त्यासाठी संस्था तत्पर असेल मज्ञानतीर्थ युवक महोत्सव २०२३फचे आदर्श आयोजन दयानंद शिक्षण संस्थेने केले. त्याची नोंद विद्यापीठाच्या इतिहासात सुवर्ण अक्षराने नक्कीच नोंदवली गेली असेल. असे विचार कार्यक्रमाचेअध्यक्ष




लक्ष्मीरमण लाहोटी यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

या सत्कार सोहळ्याचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी केले. आपल्या प्रास्ताविकपर मनोगतात विद्यार्थ्यांनी शारिरीक, मानसिक व बौध्दीक क्षमतांचा विकास करुन, आपल्या कौशल्याने महाविद्यालयीन स्तरापा-सून ते केंद्रस्तरापर्यंत नावलौकीक मिळविला आहे. हे सांगत असताना छोट्या-छोट्या रांगोळी स्पर्धांच्या माध्यमातून राष्ट्रपातळीवरील स्पर्धामध्ये यश संपादन करणाऱ्या आदित्य कुलकर्णीचे उदाहरण सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रेरक आहे. यासाठी दयानंद शिक्षण संस्था ही नियमितपणेप्रेरणा देण्यासाठी कार्यरत असते.

गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेच्या प्रेरणेतुन ज्ञानवृध्दी व्हावी. व गुणवंतांची संख्या वाढावी या हेतुने विद्यापीठात प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिक दिले जाते. दयानंद शिक्षण संस्थेकडून विद्यापीठ गुणवंतांना एकुण रु. १,४२०००/- चे रोख पारितोषिक वितरीत करण्यात आले. तसेच महाविद्यालयामधुन प्रथम व द्वितीय वर्षात वर्गातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु. ५०००/-प्रमाणे एकुण ९५०००/-, विद्यापीठात विषयात प्राविण्य प्राप्त करणाऱ्या एकुण ३ विद्यार्थ्यांना रु. १५०००/-, राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत राष्ट्रीय,राज्यस्तरीय आणि विभागीय शिबीरात प्राविण्य प्राप्त १४ स्वंयसेवकांना एकुण रु. ३३९००/-, क्रीडा विभागाकडून आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय,राज्यस्तरीय, विभागीय आणि शालेय स्पर्धेत विविध खेळांच्या माध्यमातून प्रथम आलेल्या खेळाडूंना एकुण रु. ५५०००/- चे बक्षीस वितरीत करण्यात आले. इयत्ता १२वी बोर्ड परीक्षेत प्रथम, द्वितीय व तृतीय येणाऱ्या गुणवंतांना रु.२२०००/- रोख रक्कमेचे बक्षीस वितरीत करण्यात आले. विविध कला, सांस्कृतिक प्रकारामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदक देऊन गौरविण्यात आले. एकुण रु. ३,६२,९००/- इतक्या मोठ्या रोख रक्कमेच्या प्रमाणात दयानंद शिक्षण संस्थेकडून कला महाविद्यालयातील गुणवंत, क्रीडा विभागातील खेळाडू, सांस्कृतीक विभागातील विविध कलावंत, रा.से.यो., युवा संसद, इ.१२वी बोर्ड इत्यादींना पारितोषिके वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी दयानंद कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, फार्मसी, इन्स्टीट्युट ऑफ फार्मसी इत्यादी महाविद्यालयातील प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, कार्यालयीन अधिक्षक, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# काळे यांच्या हस्ते विविध विकास कामांचे उद्घाटन

धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) - शहरातील विविध प्रभागातील विकास कामांचे उद्घाटन भारतीय जनता पार्टीचे माजी जिल्हाध्यक्ष तथा लोकसभा निवडणूक प्रमुख नितीन काळे यांच्या हस्ते करण्यात आले.

या कामांमध्ये प्रामुख्याने रस्ते तयार करणे, उद्यानाचे सुशोभीकरण करणे, नवीन नाल्यांची निर्मिती करणे, धार्मिक स्थळे असणाऱ्या देवस्थानाच्या सभामंडपाची कामे, इत्यादी विविध विकास कामांचे भमिपूजन करण्यात आले. धाराशिव शहरातील प्रभाग क्रमांक १ ते १९ यामध्ये सहारा कॉलनी, बिलाल नगर, भवानी नगर, साई नगर, दत्त नगर, प्रेरणा नगर, मिलिंद नगर,बँक कॉलनी, साठे नगर, पापणाश नगर, आंबेडकर नगर, माणिक चौक, जुनी गल्ली, नेहरू चौक, गणेश नगर, शिवाजी नगर - सांजा रोड, भानू नगर, रण सम्राट चौक, सांजा वेस गल्ली, तांबरी विभाग या सर्व भागातील विविध विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य युवराज बप्पा नळे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य प्रवीण पाठक, भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजसिंह राजे निंबाळकर, महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा नंदाताई पुनगुडे, शहराध्यक्ष अभय इंगळे, सुनील तात्या काकडे, राहुल काकडे, दाजी आप्पा पवार, संदीप इंगळे, संदीप कोकाटे, दत्ता पेठे, बापू पवार, अरुण पेठे,गणेश मोरे, प्रकाश दिवाने, सागर भोसले, पांडुरंग शिंदे, सकलीन शेख, उपेंद्र थिटे, शरद देगावकर, कुणाल गांधी, वसीम पठाण, केदार मोरे, प्रमोद पडवळ, बाळासाहेब मुंदडा, अवस्थी सर रोहित देशमुख, गणेश इंगळगी, किशोर पवार, बप्पा उंबरे ,अमोल राजे निंबाळकर, प्रवीण सिरसाटे, प्रसाद मुंढे, प्रेम पवार, रमण जाधव, वैभव हंचाटे, धनराज नवले, अक्षय विंचुरे, सागर दंडनाईक आदींसह प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एक एकमेव उदाहरण

सी. राधाकृष्ण राव साठाव्या वर्षी सेवानिवृत्त झाले आणि आपल्या मुली व नातवंडासहीत अमेरीकेत राहायला गेले.

तेथे ६२ व्या वर्षी तेथील पिट्सबर्ग विश्वविद्यालयात सांख्यिकी चे प्रोफेसर बनले आणि ७० व्या वर्षी पेंसिल्वेनिया विश्वविद्यालयात विभाग प्रमुख बनले.

७५ व्या वर्षी अमेरीकी नागरिकता मिळाली. ८२ व्या वर्षी विज्ञानाचे राष्ट्रीय पदक, एक व्हाइट हाउस सन्मान मिळाला. आज १०२ व्या वर्षी त्यांना सांख्यिकी चा नोबेल पुरस्कार मिळाला.

भारत सरकारने त्यांना आधीच पद्मभूषण (१९६८) आणि पद्म विभूषण (२००१) हे पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. राव म्हणतात, भारतात रिटायरमेंट नंतर कोणीही विचारत नाही. सहकारी सुद्धा विद्वतेचा नव्हे तर सत्तेचा सन्मान करतात.

१०२ वर्षांच्या वयात उत्तम आरोग्य आणि नोबेल प्राप्त करणे, संभवत: पहिलेच उदाहरण आहे. ही एक अशी घटना आहे, जी आम्ही कायम लक्षात ठेवली पाहीजे. सेवानिवृत्त होणे म्हणजे अकर्मण्य बनणे असा होत नाही. जीवन हे शेवटच्या श्वासापर्यंत, पुर्ण उत्साहात जगण्याचे नाव आहे.






**नांदगाव ता जि लातूर येथे दयानंद विधी महाविद्यालय लातूर च्या वतीने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना शिबीरात विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधून रेणा साखर दिलीपनगर द्वारा सुरू असलेल्या सहकारमहर्षी दिलीपरावजी देशमुख स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व ग्रंथालय केंद्राची माहिती देऊन विद्यार्थ्यांनी या मोफत सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन केले.**

# लातूर ६ नॅशनल लेवल मेट्रो ब्रेन अबॅकस स्पर्धेत हांडे अबॅकस अकॅडमी उदगीर महाराष्ट्रात प्रथम

उदगीर (प्रतिनिधी)- मेट्रोब्रेन अबॅकस कंपनीतर्फे घेण्यात आलेली सहावी नॅशनल लेवल अबॅकस परिक्षा २०२४ लातूर या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. यामध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून व बाहेर राज्यातील विद्यार्थी सहभागी होते.



यामध्ये हांडे अबॅकस अकॅडमी, उदगीर चे संचालक प्रेमनाथ संतुकराव हांडे यांना ( टॉप फ्रेंचाईज ऑफ द इयर अवॉर्ड २०२४)यांना हा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच विदयार्थ्यांनी ही यश मिळवले. जिवणे वेदांत भिमाशंकर या विदयार्थालानॅशनल टॉपर ऑफ द टॉपर २०२४हा पुरस्कार देऊन ५०००हजारांची स्कॉलरशिप देण्यात आली.प्रांजल भगवान पाटील या विद्यार्थिनीला स्टुडन्ट ऑफ द इयर २०२४ हा उत्कृष्ठ पुरस्कार देण्यात आला.पृथ्वीराज प्रशांत जगताप न५, ५००/५०० गुण घेऊन कटॅगरीतून प्रथम क्रमांक मिळवला. देवणे श्रीकांत श्रीनिवास ए.७ कॅटॅगरीमधून महाष्ट्रात प्रथम क्रमांक मिळवला. पुंड सोहम नरहरी झड.९ कॅटेगिरी मधून द्वितीय क्रमांक मिळवला. शिंदे विक्रमादित्य अरविंद ए.८ एट कॅटेगिरी मधून द्वितीय. पाटील आराध्या अनंत ए.६ कॅटेगिरी मधून तृतीय. जाधव सात्विक सचिन डी.६ कॅटेगिरी मधून तृतीय.येलमटे गौरव रामकिशन बी.८ कॅटेगिरीतून तृतीय.गुंगे आरुष बालाजी बी.६ कॅटेगिरीतून तृतीय. वट्टमवार सानवी कपिल बी.५. कॅटेगिरीतून तृतीय. प्रणव गणेश कामलवाड बी.४ कॅटेगिरीतून तृतीय. रावसाब संध्याराणी राहुल बी.६. कॅटेगिरीतून तृतीय तसेच ७५ विद्यार्थ्यांना अर्चिएवेल अवॉर्ड व मेडल, प्रमाणपत्र देऊन मेट्रोबेन अबॅकस च्या संचालिका सौ. सिमा संतोष लोहारे मॅडम. संचालक संतोष लोहारे सर कार्यक्रमाला उपस्थित असलेले प्रमुख पाहुणे लातूरचे माजी महापौर मा. श्री. विक्रांत भैय्या गोजमगुंडे. मा.श्री. अजितभैया पाटील कव्हेकर (नरसेवकलातूर) मा. श्री. बसवरावजी धाराशिवे. या मान्यवराच्या हस्ते सर्वांना सन्मानित केले. त्यामुळे हांडे अबॅकस अकॅडमी, उदगीर चे संचालक: हांडे. पी.एस . सर तसेच विद्यार्थ्यांचे सर्व पालकाकडून अभिनंदन करण्यात आले. हांडे मेट्रो ब्रेन अबॅकस अकॅडमी, उदगीर गेली पाच वर्ष उदगीर नगरीत अबॅकस चे महत्त्व पटवून देत आहे. त्यातूनच विद्यार्थ्यांचे गणिताचे भय कमी होणे. व्यवहारिक ज्ञान वाढणे. मुले मेंदूच्या उजव्या व डाव्या बाजूचा वापर करणे. विद्यार्थ्यांना टेस्ट करेज वाढणे. मुले मोबाईल पासून विभक्त होतात. मुले कॅल्क्युलेटर पेक्षा वेगाने गणित करतात.अशा अनेक विद्यार्थ्यांच्या सूक्त गुणांना वाव देण्याचा प्रयत्न करत आहे. तसेच गेली पाच वर्ष अनाथ मुलांसाठी व भारतीय सैन्यात कार्यरत असलेल्या मुलांसाठी यांची ५०% फीस हांडे अबॅकस अकॅडमी स्वतः भरत आहेत.

# निष्क्रीय भविष्याकडे

आज बालवाडीपासुनच फुकटचा भात अंडे शिरा देउन बालमनापासुनच लाचारीची सुरुवात होते व पुढे तरूणपणी दहा रुपयांत जेवण १०० यूनिट्स मोफत, वीज फुकट, रेशन सरसकट कर्जमाफी ह्या गोष्टीची आशा लावुन सध्याच्या सरकारने आणू घातलेल्या या योजना समाजाच्या मानसिकतेवर अतिशय घातक परिणाम करून जाणार आहेत.

देशात सध्या जवळपास ६७% लोकसंख्या तरुणांची आहे, हेच प्रमाण महाराष्ट्रातही आहे. ज्या वयात आपले भविष्य घडवण्यासाठी कष्ट करायला हवेत त्या वयातल्या तरुणाला महीना ६०० रुपये दिले की जेवण, मोफत वीज, सरसकट कर्जमाफी अशाने त्याची विधायक क्रयशक्ती संपून जाणार आहे.

ग्रामीण भाग असो किंवा शहरातील चौक बहुतांश ठिकाणी महागड़े ेलळश्रश, लळज्ञश तोंडात गुटखा, अशी ही बहुतांश तरुणाई पार ट्रम्प कसा चुकतो पासून गावातल्या फ्लेक्सवर आपला फ़ोटो कोणत्या पोज़मध्ये टाकायचा याच चर्चेत असते.

आता हीच तरुणाई या फुकटचे दान वाटणाऱ्या राजकीय पक्षांच्या सतरंज्या उचलायला उपलब्ध होते. फुकट जेवण, फुकट वीज, थोडासा बेरोजगार भत्ता फुकट रेशन याने एक आख्खी कर्तृतवान पिढी बर्बाद होणार आहे.

आजच्या तरुणाकडे आशिष्ठः द्रढिष्ठाः बलिष्ठाः हि सामर्थ्य असायला हवीत, हा तरुण धेयवादी असावा तरच तो या गोष्टींना लाथ मारील व मला फुकटचे नको असे सांगेल.

सगळेच फुकट अशी सवय लागली की पुढच्या सरकारकडून हीच त्यांची अपेक्षा राहणार कोणतीही गोष्ट आकाशातून फुकट पड़त नसते, या साठी लागणारा निधी जे ५-६ टक्के करदाते आहेत ते व शेवटी ते शेतकऱ्यांच्या मुळावर महागाईचे रुपात येऊन पडते.

स्विझजरलैंडमध्ये ३-४ वर्षांपूर्वी सर्व नागरिकांना सरकारने तिजोरीत शिल्लक असलेली गलेलट्ठ रक्कम दरमहा फुकट देऊ केली होती.

तेव्हा ७७% लोकांनी आम्हाला फुकटचा पैसा नकों, आमची क्रयशक्ती कमी होईल असे सांगून याला विरोध केला.

आपल्याला स्विट्झरलैंडची सौंदर्य, सुबत्ता दिसते पण त्या मागे प्रत्येक नागरिकाची जिद्द कर्तव्यनिष्ठता आपण विसरतो.

आपल्याला जर खरच स्वतः ला आणि देशाला संपन्न करून प्रगतिपथावर न्यायचे असेल तर सगळेच फुकट ही मानसिकता सोडा आणि अशी अफू देणाऱ्या व्यवस्थेला दूर करण्याचा निश्चय मी आज मनापासून करेल.

सरकारने ही जीवनावश्यक वस्तू रास्त भावात द्यायलाच हव्यात. मी स्वतः शेतकरीच आहे, अन्न खाण्यासाठी पैसे नाहीत, किमान आपण राहत असलेल्या घराचे १०० units चे बिल भरण्याचे पैसे नाहीत अशी अवस्था अपवाद सोडता कुठेही नाही. मोबाईल, राजकारण, अतिरंजित मीडिया, जात या विळख्यातून मुक्त होण्यासाठी धड़पडणाऱ्या तरुणाईला ही फुकटची अफू निर्बल निष्क्रिय करण्याचा धोका होतो व यातूनच मग आपल्या संतानी म्हटल्या प्रमाणे रिकामे मन, सैतानाचे घर यानुसार दुराचार, बलात्कार, व्याभिचार, लुटमार वाढतात व राष्ट्राचे प्रगतीऐवजी यातुन नुकसानच जास्त होते.

# जागतिकीकरणातील आजचे ग्रामीण वर्तमान

**जवळा ( दे ) ता .लोहा येथे आज रविवारी होत असलेल्या दुसऱ्या जनहित मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा . महेश मोरे यांचे अध्यक्षीय भाषण .**

दुसऱ्या जनहित ग्रामीण साहित्य संमेलनाच्या उद्घाटनाच्या निमित्ताने माजी आमदार व माजी खासदार डॉ. भाई केशवराव धोंडगे या विचारपीठावर उपस्थित उद्घाटक माननीय आमदार मोहन आण्णा हंबर्डे, विशेष अतिथी कविवर्य देवीदास फुलारी, प्राचार्य डॉ. अशोक पाटील गवते, गावाचे प्रथम नागरिक सरपंच सौ. इंदुताई माधवराव पावडे, मा. अंबादासराव देशमुख, मा. गोविंदराव देशमुख, बापूसाहेब मोरे, मा. धोंडिबाराव शिखरे, मा. बालाजीराव पावडे, माजी सरपंच साहेबराव शिखरे, कैलास मोरे, संयोजक, आयोजक भैय्यासाहेब गोडबोले. गोडबोले यांचा ७ जानेवारी २०२४ रोजी फोन आला. सर तुमचे अभिनंदन ! तुम्ही आमच्या संमेलनाचे अध्यक्ष. आता तुम्ही नकार देऊ नका. मी त्यांना होकार दिला. उपस्थित साहत्यप्रेमी नागरिक बंधू भगिनींनो, आपण अतिशय जिव्हाळ्याने, आपुलकीने, एकमताने दुसऱ्या जनहित ग्रामीण साहित्य संमलनाच्या अध्यक्षपदी माझी निवड केली. या संमेलनास आपण सर्वांनी हजेरी लावली. यासाठी संयोजक आणि सल्लागार मंडळ यांच्याप्रति मी कृतज्ञता व्यक्त करतो. कथा, कादंबरीकार डॉ. राम वाघमारे यांनी पहिल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भुषविले आहे. माजी आमदार व मा. खा. डॉ. भाई केशवराव धोंडगे यांचा सहवास मला २९ वर्षे लाभला. आमच्या संस्थेचे पवित्र आणि घोषवाक्य मविद्या हेच जीवन अविद्या हेच मरणफ हे ब्रीद उराशी बाळगून ज्ञानसाधनेचा पाईक होण्याचा हा माझा मानस आहे. मागील गेल्या ३५ वर्षांपासून मराठी साहित्याच्या क्षेत्रात माझे जे काही योगदान आहे ते आजचे हे अध्यक्षपद माझ्या साधनेचा सन्मान आहे असे मी समजतो.. जवळा देशमुख येथील गावकऱ्यांच्या भावनांचा स्वीकार करतो.

लोहा तालुक्यातील जवळा देशमुख या गावाविषयी, माणसांविषयी माझ्या मनात नितांत आदर आहे. या भागात मोठमोठी माणसं झाली. त्यांनी आपला कर्तृत्वातून नाव, गाव, कीर्ती मिळविली. पण इमान नाही गमावले. इथल्या माणसांनी माणुसकी जोपासली. गोरगरीब जनतेला मदतीसाठी ही जवळा देशमुख गावची मंडळी धावून येतात. ते शेतीमातीवर जितका जीव लावतात तितकाच जीव ते कोणी अडचणीत आहे अशांना लावतात. प्रति देहू संत जगद्गुरू तुकाराम महाराज असणारी सोनखेडनगरी ती माझी कर्मभूमी. १९८०मध्ये ह. भ. प. मुंजाजी महाराज बेटसांगवीकर यांनी मआद्यवेत मंकरंदफ हा ग्रंथ लिहिला. मवृत्ती प्रभाकर चांगदेव पासष्टीफ हे त्यांनी लिहिले आहे. असे संत ज्ञानेश्र्वरांनी म्हटल्याप्रमाणे, मखळांची व्यंकटी सांडो, चांगूलपणा येवो, वाकडेपणा जावो, नास्तिकपणा जावोफ इथल्या मातीतील माणसांना हे गाव, हा परिसर सुंदर करायचा आहे. गाव सुंदर झाले की तालुका सुंदर होणार... दिल्याने वाढत जाते... प्रेम असो, आपुलकी असो... टेळकी आणि वडगाव या ठिकाणी इथल्या भुमिपुत्राने रझाकाराच्या विरोधात बंड केले, या गावी नऊ हुतात्म्ये झाले. वेळ प्रसंगी इथल्या तरुणांनी या परिसरातील भागातील जवानांनी मातृभूमिसाठी बलिदान दिले आहे. शहीद संभाजी कदम यांनी देशासाठी रक्त सांडले. हा माझा विद्यार्थी. १९९४मध्ये आपल्याकडे मी या पसिरात येत असे. माझ्या वर्गात मुलांची संख्या ८२ ते ९०पर्यंत असायची. पण मुलींची संख्या मात्र २ ते ५ एवढीच असायची. मी गावोगावी फिरलो. मुलींना शाळेत पाठवा असे सांगत होतो.



आता मुलींची संख्या माझ्या ११ व १२वीच्या वर्गात ७० ते ८० एवढी आहे. मात्र मुलांची संख्या १० ते १५पर्यंत असते.

आकाशाच्या पोटी चंद्र तारांगणा दोन्हीशी सवसाटी करू नये.फ आकाशात चंद्र, तारे आहेत. दुधाच्याही अंगी निघे तूप लोणी दोन्ही एक मापे मोजू नये. प्रत्येकाचे अस्तित्व ज्यांच्या त्यांच्या ठिकाणी आहे. दुधापासून दही, लोणी, तूप होते. पण तुपाचे दूध होत नाही.

साहित्य तरी काय असते? आपल्या जीवनाचा विचार हेच साहित्य आहे. आपण केवळ माणसाचा विचार न करता इथल्या सृष्टीचा, शेती, मातीचाही विचार करावा. इथे पिकणारी ज्वारी, केळी, कापूस, ऊस त्यासाठी बळीराजाची मेहनत... त्यांचे कष्टशास्त्र आजही नीतिमत्ता, नैतिकता, प्रामाणिकतेच्या इमानदारीतआहे. त्यांच्या घामातून मोती विकत आहेत. आज विज्ञानाची कास धरून नव्हे बदल इथला शेतकरी स्वीकारीत आहे. ऊस, केळीत आंतरपिक घेत आहे. शेतीविषयक जोडव्यवसाय तो स्वतः करीत आहे. अजून काही जोडउद्योग सुरू केला तर त्याची आर्थिक परिस्थिती भक्कम होऊ शकते. केवळ मातीवर आपण जगू शकत नाही. त्यासाठी जोडधंदा आवश्यक आहे. आज रासायनिक खतांचा, औषधांचा प्रचंड मारा होत आहे. त्यामुळे जमिनीचा पोत बिघडत आहे. खरे तर शेतीसाठी सेंद्रिय खताची नितांत गरज आहे. लेखक कवींच्या हातून कृषीजाणिवा सहज येत आहेत.

संत ज्ञानेश्र्वर ते संत तुकारामापर्यंत हा प्रवास समाजाला सात्विक कर्माने जाण्याचा आहे. अंतरीचे धावे.. स्वभावे बाहेरी धरीताही परी आवरेना. लेखक, कवी आपल्या मनातील भावना कथा, कविता, कादंबरीतून व्यक्त करीत आहेत. त्यासाठी प्रचंड वाचन करतो. वाचन आवश्यक आहे. समृद्ध आशय असलेले वाचन आपले जीवन समृद्ध करते. त्यासाठी मोबाईलवरील व्हाटसॅप, फेसबुक न हतळता आशयशील ग्रंथ वाचा. त्यामधून ज्ञान, आकलन, तर्क, अनुमान, विश्र्लेषण यासारख्या मानसशक्ती आशयपूर्ण वाचनाने समृद्ध होत जातात. माणसाची समृद्ध जीवनकडील वाटचाल प्रशस्त होण्यासाठी आशयपूर्ण वाचन अनिवार्य असते. नुसते वाचणे म्हणजे वाचनसंस्कृती नव्हे, तर वाचनातून वर्तन बदल उपेक्षित आहे. आज सर्वदूर वाचन संस्कृती रुजवून समृद्ध करणे आवश्यक आहे. संत ज्ञानेश्र्वरापासून संत तुकाराम वाचा. आपण टॉलटॉय, शेक्सपियर, पी. बी. शैली, हेमिंग्वे, प्रेमचंद वाचा... इंग्रजी वाचता येत नसेल तर या ग्रंथाचे भाषांतर, अनुवाद, रूपांतर, स्वैर अनुवाद वाचता येईल... स्वैर अनुवादानमूळसहित्यकृतीमधील भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक वातावरण अनुवादित साहित्यकृतीत बदलले जाते. लक्ष्य भाषेतील, भौगोलिक, सामाजिक वातावरण विचारात घेऊन स्वैर अनुवादात आवश्यक ते बदल केले जातात. यासाठी आपल्या मनाची वैचारिक बैठक आवश्यक आहे.

आता शेतीसाठी काय आवश्यक आहे? ज्या शेतकऱ्याकडे पाच ते सात एकर जमीन आहे अशाने एक एकर जमीन भिजवणीची ठेवावी. त्यामुळे त्याला त्यातून माझ्या घरासाठी लागणारा भाजीपाला, थोडा गहू, हरबरा घेता येईल. त्याच्या बैलासाठी हिरवा चारा पिकवता येईल. आपल्या गाई म्हैशींना, बैलांना पिण्याच्या पाण्याची सोय उन्हाळाभर होईल. हे प्रत्येक शेतकऱ्याला आवश्यक आहे. तरच आत्महत्या थांबतील. शेती का तोट्यात आली ?

कधी अतिवृष्टी, कधी अवर्षण.. दुष्काळाने शेतकरी भरडला जातो. शेतात उत्पन्न अधिक आले तर भाव घसरला जातो. आपल्या मालाला अजूनही हमी भाव नाही. ज्याप्रमाणे एखादे रासायनिक औषध कापसावर फवारण्यासाठी घ्यायचे आहे त्याची किंमत कंपनीचे लेबल असते ५ हजार रू. लिटर पण आमच्या सोयाबीनच्या क्विंटलच्या पोत्यावर १०,००० रु नसते. शेतकऱ्याच्या शेतात जेव्हा प्रचंड उत्पन्न निघते, तेव्हा ४५०० रुपये सोयाबीनचा भाव असतो. जेव्हा सर्व माल शेतकरी विकतो. सहा-सहा महिन्यानंतर शेतकऱ्याकडे विक्रीसाठी माल नसतो. तेव्हा तेच सोयाबीन ८००० रु. क्विंटल होते. हळदीचे तसेच आहे. शेतकऱ्याकडे हळदीचे एक खोंबही नसते. तेव्हा हळदीचे भाव वसमतसारख्या मार्केट मध्ये २५,००० रु क्विंटल झालेले, आपण पाहिले आहेत. एवढे असून कधी गारपीट, कधी वादळ, वारा यातून शेतकऱ्याचे प्रचंड नुकसान होत आहे. हिरवागार दिसणारा शिवार एका दहा-पंधरा मिनिटात गाराच्या माराने तोंडी आलेला घास मातीत मिसळला जात आहे. बरे यावरही थांबणे नव्हे असे अनेक विघ्न आहेत. रोही, रानडुकर, वानरे असे जंगली प्राणी शेतात घुसून रातोरात शेतीचा सपडासाफ करीत आहेत. यामुळे शेती तोट्यात आली आहे. पण तोट्यात आली म्हणून शेतकरी शेती व्यवसाय सोडत नाही. कारण त्याने खऱ्या अर्थाने शेतीला जीव लावला आहे. तो पिकाला लेकरासारखे जोपासतो. कष्ट करणाऱ्या शेतकऱ्याला कधीच कमी पडत नाही. पण या व्यस्थेने आपणाला साथ देणे गरजेचे आहे. व्यवस्थेचे असे झाले आहे, आंधळे जन्मले कुशी स्तनपान करते अहर्निशी! दशा तसी उपदशा... एखांद्या आईला जन्मतःच आंधळे बाळ जन्मले. आपण त्याला म्हणालो, मकाय निसर्ग आहे.फ त्याला तो दिसणार नाही. पुन्हा त्याला आपण असे म्हणालो, महे घे कपाटाची चावी. त्यातील पैसे घेऊन ये... तो काय करेल त्या चावीला गरगर फिरवेल आणि फेकून देईल... तशी अवस्था आता व्यवस्थेची झाली आहे.

**- (सौजन्य: धंजय गुडसूरकर )**

**महाराष्ट्र साहित्य, सांस्कृतीक महामंडळ**

# गटशिक्षणाधिकारी जयसिंह जगताप गुरु गौरव पुरस्काराने सन्मानित

**माधव होनराव**

जळकोट : जळकोटचे गटशिक्षणाधिकारी जयसिंह जगताप यांनी शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी केल्याबद्दल त्यांना शिक्षक परिषदेचा जिल्हास्तरीय आदर्श गटशिक्षणाधिकारी गुरू गौरव पुरस्कार लातूरच्या दयानंद सभागृहात ता. १० मार्च रोजी मान्यवरांच्या



हस्ते देण्यात आला.

जळकोटचे जयसिंहजी जगताप यांना यावर्षीचा आदर्श गटशिक्षणाधिकारी गुरु गौरव पुरस्कार महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने जाहीर झाला होता. या पुरस्काचे वितरण लातूर येथील दयानंद सभागृहात रविवारी शिक्षक आ. विक्रम काळे, मा. आ. बब्रुवान खंदाडे, अजित पाटील कव्हेकर, शिक्षक परिषदेचे जि. अध्यक्ष मच्छिंद्र गुरमे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांच्या समर्पित कार्याने व व कुशल प्रशासनातून जळकोट सारख्या डोंगरी तालुक्यास शैक्षणिक प्रवाहात आणण्याचे कार्य ते सातत्याने करत आहेत.जळकोट तालुका आज विविध शैक्षणिक बाबतीत लातूर जिल्ह्यामध्ये अग्रेसर ठरत आहे.

तालुकास्तरावर असणारे शिक्षकांचे प्रश्न विनाविलंब सोडविण्याचा त्यांनी ध्यास घेतलेला आहे. सामान्य शिक्षकांचे कोणतेच प्रश्न कार्यालयामध्ये प्रलंबित न ठेवता शिक्षकांना आपले लक्ष अध्यापनावर केंद्रित करता यावे, यासाठी त्यांनी नियोजनबद्ध प्रयत्न ते करत असतात. विशेष म्हणजे महिला शिक्षकांच्या बाबतीत त्यांनी अत्यंत सहानुभूतीने भूमिका घेऊन त्यांचेही प्रश्न प्राधान्याने मार्गी लावण्याचे काम ते करत आह त. एक शिक्षक ते सर्वोत्तम गटशिक्षणाधिकारी हा त्यांचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी असाच आहे. आपल्या सद्वर्तनातून त्यांनी शिक्षण क्षेत्रात अनेक आदर्श निर्माण केलेले आहे.

जळकोटचे गटशिक्षणाधिकारी जयसिंह जगताप यांना शिक्षक परिषदेचा जिल्हास्तरीय बहुमान मिळाल्याबद्दल त्यांचे राज्याचे कॅबिनेट मंत्री ना. संजय बनसोडे , जळकोट न. पं. चे उपनगराध्यक्ष मन्मथआप्पा किडे, तहसिलदार सुरेखा स्वामी , गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार यांच्यासह सर्व शिक्षक संघटना पदाधिकारी व शिक्षक बंधू -भगिनींनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.




## जाहीरनामा

**तहसील कार्यालय जळकोट (शाखा दंडणीय)**

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि

दि.२६/०२/२०२४

ज्याअर्थी अर्जदार वाघमारे गोविंदा संजय वय १९ वर्ष रा. रावणकोळा ता. जळकोट जि. लातुर यांचा जन्म मौजे रावणकोळा ता. जळकोट जि. लातुर येथे अर्जदार यांचे स्वगृही दिनांक ०५/०५/२००५ रोजी झाला असुन जन्म-मृत्यु नोंदवहीला त्याच्या जन्माची नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार वाघमारे गोविंदा संजय यांचा जन्म दिनांक. ०५/०५/२००५ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार वाघमारे गोविंदा संजय यांचा जन्म दिनांक ०५/०५/२००५ रोजी झालेबाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहु अर्जदार वाघमारे गोविंदा संजय यांचा जन्म दिनांक- ०५/०५/२००५ रोजीची नोंद ग्रामपंचायत कार्यालय रावणकोळा ता. जळकोट जि.लातुर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक २६/०२/२०२४ रोजी दिले

पुढे नेमलेली तारीख २६/०३/२०२४

**तालुका दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार जळकोट**

## वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत जाहीर नामा

मा.के.ए.पोवार,२रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर ,उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळअर्ज क्र.२०२

निशाणी क्र.०७

ज्याअर्थी नामे Parwati W/o Kallappa Biradar हे हे R/0 Malwadi tq.udgir Dist Latur दि. १२/०९/२०२३ रोजी at. Malwadi tq.udgir Dist Latur येथे मयत झाले आहेत. व अर्जदार

1) Rajesh S/o Kallappa Biradar -ge--50,Occ.--gri

2) Prashant S/o Kallappa Biradar -ge--45,Occu---gri

3) Nagnath S/o Kallappa Biradar -ge-40 -Occu---gri

R/o Malwadi tq.udgir Dist Latur

खालिल नमुद पाच व्यक्ती हे मयताचे वारस असुन

) Rajesh S/o Kallappa Biradar -ge--50,--Son

2) Prashant S/o Kallappa Biradar -ge--45,Occu---Son

3) Nagnath S/o Kallappa Biradar -ge-40 -Occu---Son

अर्जदार यांनी Parwati W/o Kallappa Biradar या नावाचे त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकिय व निमशासकिय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणी ह्या लेखावरुन असे कळवण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्कात लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू झरीुरींळ थ/ घरश्रश्रररि इळीरवरी यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक१३/०३/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढुल तारीख:-२५/०४/२०२

(के.डी. सीर्यवंशी )
कनिष्ठ लिपीक
२रे सह दिवाणी न्यायालय
क. स्तर,उदगीर

**आदेशावरुन**
(एस.एम.शेटे)
सहाय्यक अधिक्षक
सहदिवाणी न्यायालय
क.स्तर,उदगीर

## वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.जे.सी.गुप्ता.सहदिवाणी न्यायाधिश क.स्तर उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १९३/२०२४

निशाणी क्र.०७

ज्याअर्थी नामे Ramesh Maroti Yemalwar हे दि.०८/१०/२०१९ रोजी णवसळी येथे मयत झाले आहेत व अर्जदार

१) Balaji Ramesh Yemalwar age-48 ,Occu--Vervice

R/o - Udgir Tq. Udgir Dist .Latur

यांनी खालील नमुद सहा व्यक्ती हे मयताचे वारस असुन

१) Mangalbai W/o Rameshrao Yemalwar ,-ge-64,--Wife

2) Balaji S/o Ramesh Yemalwar age- 48,--Son

3) Govind S/o Ramesh Yemalwar age-Son

4) Shivaji S/o Ramesh Yemalwar age--38,--Son

5) -nkita D/o Santosh Yemalwar age--15,--Grand Daughter

6) -jit Santosh Yemalwar age--11,--Grand Son

-अर्जदार याने Ramesh Maroti Yemalwar या मयताचे वारस असल्याबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र शासकिय व निमशासकिय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणी ह्या लेखावरुन असे कळवण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्कात लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू ठराशीह चर्रीेंळ धशारश्रुरी यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांका १४/०३/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख:-२०/०४/२०२४

(संतोष डी.शिंदे)
कनिष्ठ लिपीक
सह दिवाणी न्यायालय
क. स्तर,उदगीर

आदेशावरुन
पी.एस.देशपांडे
साह्यक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय
क. स्तर,उदगीर

## जाहीरनामा

जा.क्र.२०२४/एम.ए.जी./कावि.

दि.०४/०३/२०२४

ज्याअर्थी अर्जदार बालाजी शिवाजी बने रा. किनीयल्लादेवी ता. उदगीर यांचा मुलगा नामे स्वराज बालाजी शिवाजी बने रा.किनीयल्लादेवी यांचा जन्म दिनांक २६/१०/२०२० ता. उदगीर येथे झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार यांचा मुलगा स्वराज बालाजी शिवाजी बने ता.उदगीर यांनी त्यांचा जन्म दिनांक २६/१०/२०२० रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणे बाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक २८/०२/२०२ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा मुलगा नामे स्वराज बालाजी शिवाजी बने यांचा जन्म दिनांक २६/१०/२०२० या तारखेस झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदारयांचा मुलगा स्वराज बालाजी शिवाजी बने यांचा जन्म दिनांक २६/१०/२०२० रोजीची नोंद ग्राम विकास अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय किनी यल्लादेवी ता.उदगीर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल,

आज ०४/०३/२०२४:रोजी दिले

पूढे नेमलेली तारीख ०६/०३/२०२४

**तालूका दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार उदगीर**

## वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.जे.सी.गुप्ता.सहदिवाणी न्यायाधिश क.स्तर उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २०५/२०२४

निशाणी क्र.०७

ज्याअर्थी नामे Saraswati W/o Ganpat Valapurkar Saraswati Balwant Degaonkar हे दि.०१/०२/२०२४ रोजी डेश्ररींी येथे मयत झाले आहेत व अर्जदार

Baswaraj W/o Ganpatrao Valapurkar age-71 ,Occu--Pensioner,

R/o - Shrinagar Society, Bidar Road Udgir Tq. Udgir Dist .Latur

यांनी खालील नमुद सहा व्यक्ती हे मयताचे वारस असुन

1) Baswaraj Ganpatrao Valapurkar ,-ge-,-71- Son

5) Dou.Nanda Prakash Degaonkar age--68,-- Daughter

-अर्जदार याने Saraswati W/o Ganpat Valapurkar Saraswati Balwant Degaonkar या मयताचे वारस असल्याबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र शासकिय व निमशासकिय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणी ह्या लेखावरुन असे कळवण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्कात लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Saraswati W/o Ganpat Valapurkar Saraswati Balwant Degaonkar यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांका ११/०३/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख:-१८/०४/२०२४

(संतोष डी.शिंदे)
कनिष्ठ लिपीक
सह दिवाणी न्यायालय
क. स्तर,उदगीर

आदेशावरुन
एस.एम. शेटे
साह्यक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय
क. स्तर,उदगीर

## जाहीरनामा

जा.क्र.२०२४/एम.ए.जी./कावि.

दि.०८/०२/२०२४

ज्याअर्थी अर्जदार सचिंदकुमार सखाहरी जळकोटे या.नळगीर ता. उदगीर यांची मुलगी नामे पुजा सचिंदकुमार सखाहरी जळकोटे व आरती सचिंदकुमार सखाहरी जळकोटे यांचा जन्म दिनांक ११/०८/२००९ रोजी मौजे नळगीर ता. उदगीर येथे झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार सचिंदकुमार सखाहरी जळकोटे या.नळगीर ता. उदगीर यांची मुलगी नामे पुजा सचिंदकुमार सखाहरी जळकोटे व आरती सचिंदकुमार सखाहरी जळकोटे यांचा जन्म दिनांक ११/०८/२००९ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणे बाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक २८/०२/२०२ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांच्या मुली नामे सचिंदकुमार सखाहरी जळकोटे या.नळगीर ता. उदगीर यांची मुलगी नामे पुजा सचिंदकुमार सखाहरी जळकोटे व आरती सचिंदकुमार सखाहरी जळकोटे यांचा जन्म दिनांक ११/०८/२००९ रोजी या तारखेस झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार नामे सचिंदकुमार सखाहरी जळकोटे व आरती सचिंदकुमार सखाहरी जळकोटे यांचा जन्म दिनांक ११/०८/२००९ रोजीची नोंद ग्राम विकास अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय नळगीर ता.उदगीर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल,

आज ०८/०३/२०२४:रोजी दिले

पूढे नेमलेली तारीख ०९/०३/२०२४

तालूका दंडाधिकारी तथा
तहसिलदार उदगीर

## वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.जे.सी.गुप्ता.सहदिवाणी न्यायाधिश क.स्तर उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १७२/२०२४

निशाणी क्र.०७

ज्याअर्थी नामे -nnarao S /o Gundappa Panchal Sutar हे दि.०८/०८/२०२२ रोजी Mogha Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत व अर्जदार

1) Kamalbai W/o -nnarao Panchal Sutar age-71 ,Occu--H.H.

2) Bhujang S/o -nnarao Panchal Sutar age-22 ,Occu--Education

Both R/o - Mogha Tq. Udgir Dist .Latur

`m§Zr Imbrb Z‘wX XmoZ ì`º$s ho ‘`VmMo dmag AgwZ

1) 1) Kamalbai W/o -nnarao Panchal Sutar,-ge-,-70- Wife

2) Bhujang S/o -nnarao Panchal Sutar age-22,--Son

-अर्जदार याने -nnarao S /o Gundappa Panchal Sutar या मयताचे वारस असल्याबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र शासकिय व निमशासकिय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणी ह्या लेखावरुन असे कळवण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्कात लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू -nnarao S /o Gundappa Panchal Sutar यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांका ०२/०३/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख:-२०/०४/२०२४

(संतोष डी.शिंदे)
कनिष्ठ लिपीक
सह दिवाणी न्यायालय
क. स्तर,उदगीर

आदेशावरुन
एस.एम. शेटे
साह्यक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय
क. स्तर,उदगीर

## जाहीरनामा

जा.क्र.२०२४/एम.ए.जी./कावि.

दि.०८/०२/२०२४

ज्याअर्थी अर्जदार मुजाहिद रमजान मचकुरी रा.दापका ता.मुखेड जि.नांदेड यांचा जन्म दिनांक १०/१२/२००५ रोजी मौजे देऊळवाडी ता. उदगीर येथे झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. मुजाहिद रमजान मचकुरी रा.दापका ता.मुखेड जि.नांदेड यांचा जन्म दिनांक १०/१२/२००५ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणे बाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा यांचा जन्म दिनांक १०/१२/२००५ रोजी या तारखेस झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार मुजाहिद रमजान मचकुरी रा.दापका ता.मुखेड जि.नांदेड यांचा जन्म दिनांक १०/१२/२००५ रोजी मौजे देऊळवाडी ता. उदगीर येथे रोजीची नोंद ग्राम विकास अधिकारी ग्रामपंचायत कार्यालय देऊळवाडी ता.उदगीर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल,

आज ०८/०२/२०२४:रोजी दिले

पूढे नेमलेली तारीख ०९/०३/२०२४

तालूका दंडाधिकारी तथा
तहसिलदार उदगीर

## वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.जे.सी.गुप्ता.सहदिवाणी न्यायाधिश क.स्तर उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १९७/२०२४

निशाणी क्र.०७

ज्याअर्थी नामे Yusuf Sharif S /o Hasan Sharif Momin हे दि.०८/०८/२०२२ रोजी Udgir Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत व अर्जदार

1) Mahejabin W/o Yusuf Sharif Momin age-52 ,Occu--H.H.

R/o - Rokade Manuman Road Kandar Ves, tq.Udgir Udgir Dist .Latur

यांनी खालील नमुद एक व्यक्ती हे मयताचे वारस असुन

1)Mahejabin W/o Yusuf Sharif Momin age-52 - Wife

2)Sima Begum Yusuf Sharif Momin age-32,-Daughter

3)Sadiya Yusuf Sharif Momin age-25,-Daughter

4)Jaber Yusuf Sharif Momin age-34,-Son

5)Naser Yusuf Sharif Momin age-26,-Son

6) Yasir Yusuf Sharif Momin age-24,-Son

7) Fahad Yusuf Sharif Momin age-30,-Son

-अर्जदार याने Yusuf Sharif S /o Hasan Sharif Momin या मयताचे वारस असल्याबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र शासकिय व निमशासकिय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.


त्याअर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणी ह्या लेखावरुन असे कळवण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्कात लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Yusuf Sharif S /o Hasan Sharif Momin यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांका १३/०३/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख:-२३/०४/२०२४

(संतोष डी.शिंदे)
कनिष्ठ लिपीक
सह दिवाणी न्यायालय
क. स्तर,उदगीर

आदेशावरुन
एस.एम. शेटे
साह्यक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क. स्तर,उदगीर





**उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर**

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर

फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुग्णालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!

अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ — डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) — डॉ. दिपाली पाटील (MS)

डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) — डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष — व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर — लॉ. प्रदिप बेद्रे सचिव




# पोलीस अधीक्षक कुलकर्णी यांनी सुरु केलेला.... पहाट..... उपक्रम विभागात राबविणार: मिश्रा

धाराशिव दि.१६ (प्रतिनिधी) - जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी पारधी बांधवांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी पहाट उपक्रम सुरू करून चांगले काम केले आहे. हा उपक्रम छत्रपती संभाजी नगर विभागा अंतर्गत येणाऱ्या ४ जिल्ह्यांमध्ये राबविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन छत्रपती संभाजी नगर येथील विशेष पोलीस महानिरीक्षक (ग्रामीण) विरेंद्र मिश्रा यांनी दि.१६ मार्च रोजी दिले.

पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक गौहर हसन, पोलीस निरीक्षक काशीद, पी आर भिंगारे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना मिश्रा म्हणाले की,

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस प्रशासन विशेष लक्ष देत आहे. त्या अनुषंगाने गुन्हेगारी पार्श्र्वभूमी असलेल्या ३५ जणाविरूध्द हद्दपारीची कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे तर ८ जणाविरूध्द झोपडपट्टी दादा कायद्यांतर्गत आठवडाभरात कारवाई पूर्ण होणार असल्याची माहिती छत्रपती संभाजी नगर येथील विशेष पोलीस महानिरीक्षक (ग्रामीण) विरेंद्र मीश्र व जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी दिली.

जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात शनिवारी (दि.१६) आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. उपस्थिती होती. पुढे बोलताना मिश्रा म्हणाले की, जिल्ह्यात दि.१५ मार्चपासून विशेष तपासणी सुरू आहे. यामध्ये पोलीस दलातील विविध शाखांच्या कार्याचा आढावा घेण्यात येत आहे. तर आज दि.१६ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालयातील कामकाजाचा आढावा घेतला असून उद्या दि.१७ मार्च रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्या कामकाजाचा आढावा घेण्यात येईल असे त्यांनी सांगितले. तसेच लोकसभा निवडणूक बंदोबस्तासाठी बाहेरूनही पोलीस फोर्स मागविण्यात येणार असून त्याचे नियोजन करण्यासाठी आढावा घेण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले. तर जिल्ह्यातील संवेदनशील मतदान केंद्रातील कायदा व सुव्यसथेकडेही विशेष लक्ष देण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यातील चोरी, दरोडा, घरफोडीचे गुन्हे, प्रतिबंधात्मक कारवाई या संदर्भातील कामकाजाचाही आढावा घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जिल्ह्यात पोलीस दलाचे काम समाधानकारक असून येथील पहाट, ड्रोन उपक्रम आमच्या कार्यक्षेत्रातील ४ जिल्ह्यात राबविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. ड्रोनमुळे विशेष सूचना जलद गतीने देणे शक्य असून व्हिडीओग्राफी, फोटोग्राफी करता येणार असल्यामुळे सुरक्षा व्यवस्था बळकट करण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी नमूद केले. विशेष म्हणजे गुन्हा करणाऱ्या गुन्हेगारांना शिक्षाही झालीच पाहिजे. परंतू त्यानंतर त्यास पुन्हा समाजात सामावून घेणे व पुन्हा त्याने गुन्हा करू नये, ही समाजासह पोलिसांची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. तर पोलीस अधीक्षक कुलकर्णी म्हणाले की, महामार्गावरील लुटमारीच्या वाढत्या घटना रोखण्यासाठी नाकाबंदी, पेट्रोलिंग वाढविण्यात येईल. महामार्ग पोलिसांनाही या संदर्भात सूचना देण्यात येतील. तर धाराशिव येथे सीसीटीव्ही लावण्याच्या १ कोटी रुपयांच्या कामाची निविदा प्रक्रीया झाली आहे. ते काम सुरू झाले असून २३ ठिकाणी सीसीटीव्ही बसविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्थेकडे विशेष लक्ष देण्यात येणार आहे. गुन्हेगारी पार्श्र्वभूमी असलेल्या लोकांवरील हद्दपारीची ३५ प्रकरणे उपविभागीय अधिकारी (एसडीएम) यांच्याकडे पाठविण्यात आली असून आणखी प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरू आहे. जवळपास ५० ते ६० जणांवर हद्दपारीची कारवाई होणार आहे. तर ८ जणांवर झोपडपट्टी दादा कायद्यांतर्गत आठवडाभरात कारवाई होणार असल्याचे कुलकर्णी यांनी सांगितले.

पान १ वरून

## १४ एप्रिलपासून...

कोणत्याही पक्षाच्या, नेत्याच्या किंवा कार्यकर्त्याच्या वैयक्तिक जीवनावर भाष्य करू नका. कोणत्याही जाती-पंथाच्या भावनांचा वापर करून मतदान करण्याचे आवाहन करू नका. मंदिर, मशीद किंवा इतर कोणत्याही प्रार्थनास्थळाचा निवडणूक प्रचारासाठी वापर करू नये. मतदारांना लाच देणे, त्यांना धमकावणे, मतदान केंद्रापासून १०० मीटरच्या आत प्रचार करणे हे गुन्हेगारी कृत्य मानले जाईल. मतदानाच्या ४८ तास आधी निवडणूक प्रचार आणि सार्वजनिक सभांवर बंदी लागू होईल. कोणत्याही राजकीय पक्षाच्या किंवा उमेदवाराच्या घरासमोर आंदोलने व धरणे करू नयेत. नेते आपल्या समर्थकांना त्याच्या परवानगीशिवाय कोणत्याही व्यक्तीची जमीन, इमारत, परिसर भर्ती इत्यादींवर झेंडे लावण्याची, बॅनर लावण्याची, माहिती पेस्ट करण्याची आणि घोषणा लिहिण्याची परवानगी देऊ शकत नाहीत.

राजकीय पक्ष आणि उमेदवारांनी त्यांच्या समर्थकांनी इतर पक्षांच्या सभा किंवा मिरवणुकीत अडथळे निर्माण करणार नाहीत किंवा त्यांना अडथळा आणण्याचा प्रयत्न करणार नाही याची काळजी घ्यावी.

ज्या ठिकाणी इतर पक्षांच्या सभा सुरू आहेत त्या ठिकाणी कोणत्याही पक्षाने मिरवणूक काढू नये. एका पक्षाने लावलेली पोस्टर्स दुस-या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी काढू नयेत.

सभा/रॅली सर्व रॅलीचे ठिकाण व ठिकाण याबाबत पोलिस अधिका-यांना अगोदर माहिती द्यावी. राजकीय पक्ष आणि नेत्यांनी ज्या ठिकाणी ते संमेलन घेणार आहेत त्या ठिकाणी आधीपासून कोणतेही निर्बंध नाहीत याची खात्री करून घ्यावी. सभेत लाऊडस्पीकर वापरण्यासाठी परवानगी घ्यावी. कोणतीही अनपेक्षित घटना घडू नये यासाठी सभेच्या आयोजकांनी पोलिसांची मदत घ्यावी.

मिरवणुकीसाठी काय नियम आहेत?

मिरवणूक सुरू होण्यापूर्वी त्याची सुरुवात, मार्ग आणि समाप्तीची वेळ आणि ठिकाण याची आगाऊ माहिती पोलिसांना द्यावी लागेल. तुम्ही ज्या भागातून मिरवणूक काढत आहात त्या भागात काही निर्बंध आहेत का ते आधी शोधा. वाहतुकीवर परिणाम होणार नाही अशा प्रकारे मिरवणुकीचे व्यवस्थापन करा. एकाहून अधिक राजकीय पक्षांनी एकाच दिवशी आणि एकाच मार्गावर मिरवणूक काढण्याचा प्रस्ताव दिल्यास वेळेची अगोदर चर्चा करा. रस्त्याच्या उजव्या बाजूने मिरवणूक काढावी. मिरवणुकीत शस्त्रे किंवा इतर हानिकारक साहित्य सोबत ठेवू नका. कर्तव्यावर असलेल्या पोलिसांच्या सूचना व सल्ल्याचे काटेकोरपणे पालन करावे.

मतदानाच्या दिवशी सूचना-

मतदानाच्या दिवशी सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवारांनी याची खात्री करणे आवश्यक आहे- राजकीय पक्ष आणि उमेदवारांनी त्यांच्या अधिकृत कार्यकर्त्यांना बॅज किंवा ओळखपत्र द्यावे. निवडणूक ड्युटीवर तैनात असलेल्या अधिका-यांचे सहकार्य असावे. मतदारांना दिलेली स्लिप साध्या कागदावर असावी, त्यावर कोणत्याही प्रकारचे चिन्ह, उमेदवार किंवा पक्षाचे नाव नसावे. मतदानाच्या दिवशी आणि त्याच्या ४८ तास आधी दारूचे वाटप कोणालाही करू नये. मतदान केंद्राजवळ उभारण्यात आलेल्या शिबिरांमध्ये अनावश्यक गर्दी जमवू नका. शिबिराच्या सामान्य भागात कोणतेही पोस्टर, ध्वज, चिन्ह किंवा इतर प्रचारात्मक साहित्य प्रदर्शित करू नये. मतदानाच्या दिवशी वाहन चालवण्याचे परमिट मिळवा. मतदान केंद्र : मतदारांशिवाय, ज्यांच्याकडे निवडणूक आयोगाचा वैध पास नाही अशा कोणत्याही व्यक्तीने मतदान केंद्रात प्रवेश करू नये. -निरीक्षक : निरीक्षकांची नियुक्ती निवडणूक आयोगाकडून केली जाते. उमेदवारांनाकिंवा त्यांच्या एजंटना निवडणुकीच्या कारभाराबाबत काही तक्रारी असल्यास ते निरीक्षकांच्या निदर्शनास आणून देऊ शकतात. सत्ताधारी पक्षाचे नियम काय? मंत्र्यांनी अधिकृत दौ-यात प्रचार करू नये. पक्षाच्या हितासाठी सरकारी विमाने आणि वाहने वापरू नका. पक्षाच्या हितासाठी सरकारी यंत्रणा आणि कर्मचा-यांचा वापर करू नका. हेलिपॅडवर सत्ताधारी पक्षाची मक्तेदारी दाखवू नका. सरकारी निधीतून पक्षाचा प्रचार करू नका. केंद्र किंवा राज्य सरकारचे मंत्री, उमेदवार, मतदार किंवा एजंट वगळता इतर लोकांनी मतदान केंद्रात प्रवेश करू नये.

## राज्यातील...

या धर्तीवर हिंदूंच्या मंदिरांचे पावित्र्य, शिष्टाचार, संस्कृती जपण्यासाठी महाराष्ट्र मंदिर महासंघातर्फे पुणे जिल्ह्यातील ७१ मंदिरांच्या विश्वस्तांनी त्या मंदिरांमध्ये भारतीय संस्कृती अनुरूप वस्त्रसंहिता लागू करण्याचा निर्णय घेतला आहे, असे सुनील घनवट यांनी सांगितले.

## पारदर्शक...

परवान्यासाठी एक खिडकी कक्ष स्थापन करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.

निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था, आदर्श आचारसंहिता, मनुष्यबळ व्यवस्थापन, निवडणूक खर्च, तक्रार निर्वाण, स्वीप, माध्यम प्रमाणीकरण आणि संनियंत्रण समिती यासह विविध पथके स्थापन करण्यात आली आहेत. तसेच जिल्ह्यात २४० क्षेत्रीय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. ४२ भरारी पथके, ३६ स्थिर पथके, ६ व्हिडीओ पथके आणि उमेदवारांच्या प्रचारावर निगराणी करण्यासाठी १८ पथके स्थापन करण्यात आली असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी सांगितले. गतवेळी मतदान कमी झालेल्या मतदान केंद्रावर लक्ष केंद्रित करून मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्न सुरु करण्यात आले आहेत. तसेच निवडणूक शांततामय वातावरणात पार पाडण्यासाठी प्रतिबंधात्मक कारवाया करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

असा आहे लातूर लोकसभा मतदारसंघाचा निवडणूक कार्यक्रम

भारत निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रमानुसार लातूर लोकसभा मतदारसंघाची अधिसूचना १२ एप्रिल २०२४ रोजी प्रसिद्ध होणार असून १९ एप्रिल २०२४ पर्यंत नामनिर्देशनपत्रे स्वीकारली जातील. २० एप्रिल २०२४ रोजी नामनिर्देशनपत्रांची छाननी केली जाणार आहे. तसेच २२ एप्रिल २०२४ पर्यंत नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा कालावधी राहील. ७ मे २०२४ रोजी मतदान होणार असून मतमोजणी ४ जून २०२४ रोजी होईल.

## दातृत्व आणि...

प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे दुरुस्ती, महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतून तीस लाखाच्या सिमेंट रस्ता व पेव्हर ब्लॉक रस्ता, मडकी पाझर तलाव दुरुस्ती १८ लक्ष, भिसे वाघोली ते गाधवड रस्त्याचे मजबुतीकरण १० लक्ष, पिंपरी रोड ते मसला रोड मजबुतीकरण १० लक्ष, वाडी वाघोली ते निळकंठ रस्ता मजबुतीकरण ११.५ लक्ष, भिसे वाघोली ते नायगाव रस्ता मजबुतीकरण ७.५ लक्ष यासह विविध कामाचा लोकार्पण आणि भूमिपूजन भाजपाचे नेते आ रमेशआप्पा कराड आणि खा. सुधाकर शृंगारे यांच्या शुभहस्ते करण्यात आले त्याचबरोबर सिंचन विहीरी, मोदी आवास, जनावरांचा गोठा, रमाई आवास, अहिल्यादेवी होळकर आवास योजनेतील पात्र व गरजू लाभार्थ्यांना मंजूरी पत्राचे वाटप करण्यात आले. यावेळी ग्रामस्थांनी मान्यवरांचे मोठ्या उत्साहाच्या वातावरणात विविध वाजंत्री आणि फटाक्याची आतिषबाजी करत जोरदार स्वागत केले.

यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष हनुमंतबापू नागटिळक, तालुका अध्यक्ष बन्सी भिसे, सांगायो समिती अध्यक्ष वैभव सापसोड, साहेबराव मुळे, संभाजी वायाळ, सतीश आंबेकर, श्याम वाघमारे, भैरवनाथ पिसाळ, सुधाकरनाना काळे, विश्र्वास कावळे, अशोक सावंत, सुधाकर गवळी, गोपाळ पाटील, काकासाहेब पाटील, सरपंच सौ. स्वयंम वायाळ, चेअरमन अशोक भिसे, रशीद पठाण, चंद्रकांत वांगस्कर, योगीराज साखरे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

भिसे वाघोली गावात केल्या पन्नास वर्षात जेवढा निधी आला त्याहून कितीतरी पटीने गेल्या तीन वर्षात विकास कामासाठी निधी आला. गेल्या पंधरा वर्षात निवडून आलेल्या आमदारांनी कोणती विकासाची कामे केली असा प्रश्न उपस्थित करून भाजपच्या नेतृत्वामुळे ग्रामीण भागातील विकासाला गती मिळाली असून आम्ही मंजूर केलेल्या कामाचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न निष्क्रिय आमदाराकडून केला जात आहे. साखर कारखाने शेतकऱ्यांच्या मालकीचे असतानाही उसाच्या टिपऱ्याचे राजकारण करून ऊस उत्पादकाची आडवणूक करण्याचे पाप होत आहे. मापात पाप, तोडणीत पाप, भावात पाप होत आहे याचा जाब शेतकऱ्यांनी विचारावा असे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की गोरगरीब सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून नरेंद्रजी मोदी यांनी अनेक योजना सुरु केल्या. या योजनेचा गरजू आणि पात्र असंख्य लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळाला तेव्हा सर्वांगिन हितासाठी येणाऱ्या काळात होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीत लातूर मतदार संघातून सुधाकर शृंगारे यांना आशिर्वाद देवून पुन्हा एकदा लोकसभेत पाठवावे असे आवाहन केले.

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या पावलावर पाऊल ठेवून काम करणारे रमेशआप्पा कराड साहेब यांनी माझ्या उमेदवारीसाठी कठोर भूमिका घेतली हे मी कदापि विसरू शकणार नाही असे सांगून खा. सुधाकर शृंगारे यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र शासनाने केलेल्या विविध कल्याणकारी विकास कामाची आणि लातूर मतदार संघात केलेल्या कामाची माहिती दिली.

प्रारंभी संभाजी वायाळ यांनी आ रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून भिसे वाघोली गावात होत असलेल्या कोट्यावधी विकास कामाची माहिती सांगितली उपस्थित प्रमुख पाहुण्यांचे स्वागत ग्रामपंचायत सोसायटी आणि भाजपा कार्यकर्तेच्या वतीने करण्यात आले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुफी सय्यद शमशोद्दीन यांनी केले.

या कार्यक्रमास मगनराव पाटील, बाबा भिसे, लता भोसले, प्रताप पाटील, दैवशाला मंसूरे, सत्यशीला पाखरे, परमेश्र्वर पानखडे, समाधान कदम, बापूराव बिडवे, बालाजी दुटाळ, सुधाकर वायाळ, शिवाजी भिसे, अशोक पाटील, आप्पासाहेब पाटील, हनुमंत पाटील, हकीम सय्यद, धनंजय जाधव, सचिन सवयी, जीवन हजारे, विष्णू पाटील, प्रकाश मांदळे, बाळासाहेब मांदळे, सुभाष भिसे, गोविंद पानखडे, रामेश्र्वर वायाळ, दाऊद सय्यद, विजयकुमार वायाळ, दिलीप भिसे, श्रीनिवास वायाळ, अण्णासाहेब चौगुले, हमीद पठाण, सचिन भिसे, अनिल हंडीबाग, संजय वायाळ, गौरीशंकर धुमाळ, दत्ता गायकवाड, केशव मांदळे, बाबासाहेब आदमाने, शहाजी नवगिरे, अजय ढगे यांच्यासह भिसे वाघोली आणि परिसरातील भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते सर्व स्तरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## १००१ महिलांकडून...

पासून गोड पदार्थ बनविणे,कडधान्यापासून तिखट पदार्थ तयार करणे,

कागदापासून दागिने तयार करणे,एक मिनिट शो आदींचा समावेश आहे.

लातूर व परिसरातील महिलांनी या स्पर्धांमध्ये सहभाग घेण्याचे आवाहन देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर,शुभदा रेड्डी,सुखदा मांडे व स्मिता गोजमगुंडे यांनी केले आहे.

**CHANGE IN NAME**

I have change my name from KESHAVRAO DESHPANDE To KESHVRAO DESHPANDE Hence for this declaration in future.
OLD NAME: KESHAVRAO DESHPANDE
NEW NAME: KESHVRAO DESHPANDE
In future the same name will be used by my spouse and children

**Address**
CHINCHOLI BALLALNATH ,Tq. LATUR,413511, MAHARASHTRA
Mobile No: 9422611023

**CHANGE IN NAME**

I have change my name from VENKETRAO NARHARRAO KULKARNI To VYANKATRAO NARHARRAO KULKARNI Hence for this declaration in future.
OLD NAME: VENKETRAO NARHARRAO KULKARNI
NEW NAME: VYANKATRAO NARHARRAO KULKARNI
In future the same name will be used by my spouse and children
Address:- CHINCHOLI BALLALNATH ,Tq. LATUR,413511, MAHARASHTRA
Mobile No: 9422611023

**CHANGE IN NAME**

I have change my name from VENKATRAO NARHARRAO KULKARNI To VYANKATRAO NARHARRAO KULKARNI Hence for this declaration in future.
OLD NAME: VENKATRAO NARHARRAO KULKARNI
NEW NAME- VYANKATRAO NARHARRAO KULKARNI
In future the same name will be used by my spouse and children

**Address**
CHINCHOLI BALLALNATH ,Tq. LATUR,413511, MAHARASHTRA
Mobile No: 9765041444

## जाहीरनामा

**जे.सी. ढेंगळे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश साहेब, व. स्तर, लातूर**
**किरकोळ दिवाणी अर्ज क. ५१३/२०२४,**
**केरबा वि. निल**
**निशाणी क. ०६**
**वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत**

ज्यापेक्षा हे रामराव केरबा बने, हे दिनांक १०/११/२०२३ रोजी, मौ. राठोडा, ता. निलंगा, जि. लातूर, येथे मयत झाले व अर्जदार
१. केरबा पि. रामराव बने, वय ५७ वर्षे, धंदा-नौकरी, रा. खाडगाव रोड, संभाजी नगर, लातूर, ता.जि. लातूर.
२. लक्ष्मीबाई रामराव बने.
३. ललीताबाई साधुराम बने.
४. चंद्रकला ज्ञानोबा बैकरे.
५. लक्ष्मीबाई त्र्यंबक देवकते.

सदरहू मयताचे मृत्यूपश्र्चात शासकीय व निमशासकीय योजनांचा फायदा घेण्यासाठी वारसाच्या हक्कात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयासमोर अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हा जाहीरनामा प्रसिध्द झालेल्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदर मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू न्यायालय सदरहू अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेउन त्यांच्या हक्कशाबीत दिसल्यास अर्जदारास सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देईल.

आज तारीख १६/०३/२०२४
पु.ने.ता. ३०/०४/२०२४
(धर्माधिकारी एन.एम)
क. लिपीक
२ रे सह दिवाणी न्यायालय, व. स्तर, लातूर
उजणठढ, ङ-ढणठ ✻ छजखडखछ ✻ ठ उखतखङ ऊ
आदेशावरून
१६-३२४ सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय, व. स्तर, लातूर

## लातूर शहर महानगरपालिका, लातूर

**ई-निविदा सुचना क्रं.** **सन २०२३-२४**

लातूर शहर महानगरपालिके मार्फत लातूर शहरामध्ये पुतळा उभारणी करणेच्या कामाकरिता सल्लागार अभियंता (झचउ) नियदती करणेच्या कामासाठी मा. आयुक्त यांच्याकडुन ई-निविदा मागवण्यात येत आहेत. या कामा संबंधीचा तपशिल www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

दिनांक १४/०३/२०२४
**उपायुक्त लातूर शहर**
**महानगरपालिका, लातूर**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## SRM E-TENDER NOTICE

The Superintending Engineer (Parli Circle) on behalf of MSETCL (the Employer) invites online bids (SRM E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on Mahatransco E-Tendering Website https://srmetender.mahatransco.in for following work.

| Sr. No. | Particular of Works | SRM E-Tender No. | SRM E-Tender RFx No. |
|---|---|---|---|
| 01 | Providing services of ITI Certified person in Electrical Trade as Assist. Technicians (General) on outsource basis at various EHV substations under 400kV RS Division Girwali | SE/EHVC/PV/TS/2023-24/T-37 | 7000030903 |

For further details visit our Website https://srmetender.mahatransco.in.
Contact Person: The Executive Engineer(O): Phone No. (02446)222076.
The undersigned reserves the rights to accept or reject any or all tenders without assigning any reasons thereof.

**S/d**
**Superintending Engineer, EHV (O&M) Circle, Parli-V**

**CHANGE IN NAME**

I have change my name from UJAWALA VINAYAKRAO KULKARNI To UJWALA VIKAS KULKARNI Hence for this declaration in future.
OLD NAME: UJAWALA VINAYAKRAO KULKARNI
NEW NAME: UJWALA VIKAS KULKARNI
In future the same name will be used by my spouse and children
Address:- OLD AUSA ROAD , OPP GRAMIN MARATHWADA BANK , DESHPANDE COLONY,
LATUR,413512, MAHARASHTRA
Mobile No: 7350603221

**CHANGE IN NAME**

I have change my name from JIVAN DESHPANDE To JIVANRAO DESHPANDE Hence for this declaration in future.
OLD NAME: JIVAN DESHPANDE
NEW NAME: JIVANRAO DESHPANDE
In future the same name will be used by my spouse and children
Address:- CHINCHOLI BALLALNATH ,Tq. LATUR,413511, MAHARASHTRA
Mobile No: 9765041444


## सुर्य कल्याण मुंबई रात्र

स्पेशल ४५/७८

| ५ | ८ | ९ |
|---|---|---|
| १४० | ३७८ | ४५० |
| ५२-५७ | ८०-८५ | ९१-९६ |

**प्रो. दिपक कुमार**

स्पेशल चान्ससाठी मेंबरशिप नोंदणी चालू आहे. संपर्क साधावा.
१००% चान्स पास होणार

## गोल्डन विकली चान्सेस

मिलन (उदय/अस्त)(शनिवार)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | ३९० | ६ | २४० | ० | १४५ |
| | ४८० | | २६८ | | २३५ |
| | २२८ | | ३३० | | ५५० |
| | ९२-२१ | ३६-६७ | | ८०-०४ | |

कल्याण(उदय/अस्त)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | १३९ | १ | १४६ | ८ | १२५ |
| | २३८ | | ४७० | | २६० |
| | ६७० | | १०० | | ४४० |
| | ९३-३२ | ०१-१४ | | ७८-८६ | |

ता.२५ व २९ चे जबरदस्त चान्ससाठी
**संपर्क करा**
सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारी आहे. कृपया दुरुपयोग करु नये.
मोबा-९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

### मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

### कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ४-० | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ०-७ | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

दिवाळी बंपर चालू आहे 99 75 47 98 26

## दुकान भाडयाने देणे आहे


शिवाजी चौक देगलूर रोड उदगीर १८ x ६५ ची ३ मजली ईमारत भाडयाने देणे आहे.

संपर्क
शिवशंकर नागठाणे
मो.नं. ९८९०७१८५०५
मो.नं. ८३८०८३५५७५
मो.नं. ८६००१८६५५८

यशवंत
रविवार दि. १७ मार्च २०२४

# उदगीर

पान ८



कार्यालय :०२३८५-२५३९९८ मो.९८५०२२८२४०
email - yashudgirram@gmail.com

**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

**शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७**

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग

# उदगीरसाठी स्वतंत्र आरटीओ कार्यालयास राज्य शासनाची मंजुरी

## उदगीरकरांची महाराष्ट्रात एम.एच.- ५५ ही नवी ओळख

उदगीर : तीन राज्याच्या सीमेवर असणा-या उदगीर या ऐतिहासिक शहरात आता आणखी एका कार्यालयाची भर पडली आहे.

जिल्ह्यातील प्रमुख बाजारपेठ असलेल्या उदगीर येथील लोकसंख्येचा विचार करून स्वतंत्र उपप्रादेशिक परिवहन कार्यालय स्थापन करण्याचा निर्णय राज्य शासनाच्या वतीने शुक्रवारी जाहीर करण्यात आला. त्याबाबतचा अध्यादेशही तातडीने काढण्यात आला असल्याची माहिती राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी दिली.

राज्य शासनाने दि.१५ मार्च रोजी घेतलेल्या निर्णयानुसार उदगीर येथे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी दर्जाचे (एम.एच. - ५५) या नोंदणी क्रमांकासह नवीन कार्यालय सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार नवनिर्मित उपप्रादेशिक परिवहन अधिकारी उदगीर कार्यालयासाठी आवश्यक पदे निर्माण करण्यात येणार आहेत. तूर्तास कार्यालयासाठी विहीत मानांकनानुसार आवश्यक पदे इतर कार्यालयातून समायोजित करण्याची कार्यवाही राज्य परिवहन आयुक्तांनी करावी, शिवाय, एक इंटरसेप्टर वाहनास मंजुरी देण्यात आली आहे. कार्यालय सुरू करण्यासाठी शासकीय, खासगी मालकीची जागा भाडेतत्वावर, घेण्याची कार्यवाही करावी असेही अध्यादेशात म्हटले आहे. गेल्या अनेक दिवसांपासून स्वतंत्र आरटीओ कार्यालयाचा प्रस्ताव प्रलंबित होता. त्याला मंजुरी मिळाली आहे, असेही क्रीडा मंत्री बनसोडे म्हणाले.

या कार्यालयामुळे उदगीरकरांचा लातूरला जाण्याचा वेळ वाचणार असुन उदगीर शहरातील दिवसेंदिवस वाढती लोकसंख्या व त्यानुसार वाहनांची संख्या लक्षात घेवुन मतदार संघातील वाहनधारकांची गैरसोय लक्षात घेवुन क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी स्वतंत्र उपप्रादेशिक परिवहन कार्यालय ( आर. टी.ओ. कार्यालय) स्थापन करण्याची मागणी करुन ती राज्य शासनाकडुन मंजूर करुन घेतला असल्याचे सांगितले.

अशक्य ते शक्य करण्याची किमया क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांचेकडे असल्याने मतदार संघाच्या विकासाचा प्रभाव संपुर्ण महाराष्ट्रासह व बाजूच्या राज्यात असल्याने ना.संजय बनसोडे यांचे कौतुक होत आहे.

सदर कार्यालयामुळे महाराष्ट्रात आता उदगीर शहराची नव्या क्रमांकासह ओळख निर्माण होणार असल्याने वाहनधारक व नागरिकांनी क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांचे अभिनंदन करुन आभार व्यक्त केले आहेत.

# श्री हावगीस्वामी महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ संपन्न

उदगीर / प्रतिनिधी- येथील श्री हावगीस्वामी महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारत लिबरल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अँड गुणवंतराव पाटील हैबतपूरकर हे यावेळी उपस्थित होते.

विचारपीठावर उदगीरचे तहसीलदार राम बोरगांवकर,स्वारातीम विद्यापीठाचे व्यवस्थापन सदस्य डॉ डी.एन.मोरे,संस्थेचे उपाध्यक्ष श्री शिवकुमार हसरगुंडे सचिव उमेश पाटील देवणीकर, सहसचिव श्री प्रभुराज कप्पीकेरे, कोषाध्यक्ष शंकरप्पा हरकरे, सदस्य श्री रविंद्र हसरगुंडे,सौ.मीराताई शिवपुजे, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. एन.जी.येमेकर, उपप्राचार्य अप्पाराव काळगापुरे परीक्षाप्रमुख डॉ कृष्णा अनवले,महाविद्यालय विकास समितीचे सदस्य श्री राजेंद्र पाटील, डॉ.पंडित देवशेट्टे, डॉ.सौ.सुनीता लोहारे, डॉ.सौ.यु. एस.धसवाडीकर, डॉ.विठ्ठल गोरे,प्रा.व्ही.आय.पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत संगीत विभागाच्या वतीने विद्यापीठ गीताने करण्यात आले. यावेळी स्वामी रामानंद तीर्थांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून व दीपप्रज्वलन करून मान्यवरांनी अभिवादन केले.

याप्रसंगी प्रमुख पाहुण्यांचा सत्कार शाल पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक परीक्षा विभागप्रमुख डॉ कृष्णा अनवले यांनी




केले तर स्वागतपर मनोगत प्र.प्राचार्य डॉ एन.जी.येमेकर यांनी केले.यावेळी संस्थेचे सचिव उमेश पाटील देवणीकर मार्गदर्शन करताना म्हणाले की, शिक्षणाबरोबर संस्कार आणि शिस्त महत्वाची असते.ती शिस्त सद्गुणातून येत असते असे मौलिक विचार यावेळी त्यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी उदगीरचे तहसीलदार राम बोरगांवकर यांनी शिक्षणाला चरित्राची गरज असते.शिक्षणामुळेच माणसाची प्रतिष्ठा वाढत असते. शिक्षणातून चांगला नागरिक बनणे आवश्यक असते. मोबाईलचा विधायक वापर करा.आयुष्य सुंदर करण्यासाठी धडपड केली पाहिजे.विद्यार्थ्यांनी परिस्थितीवर मात करून

कष्ट करावे त्याशिवाय यश मिळू शकत नाही.युवकांच्या ठिकाणी जिद्द चिकाटी आत्मविश्र्वास असावा. साधनाच्या अभावी किंवा प्रतिकुल परिस्थितीमुळे हतबल न होता यश संपादनासाठी सातत्याने अभ्यास करावा. विद्यार्थ्यांनी उदात्त ध्येय ठेवून मोठे होण्याचे स्वप्न पहावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

स्वारातीम विद्यापीठाचे व्यवस्थापन सदस्य डॉ. डी. एन.मोरे मार्गदर्शन करताना म्हणाले की,ज्या महापुरुषाने आपल्या त्यागी नेतृत्वाने मराठवाड्याला निजामाच्या जुलूमातून मुक्त करून अन्याय अत्याचाराविरूध्द बंड केले त्यांच्या नावाने असलेल्या विद्यापीठाची पदवी विद्यार्थ्यांनो तुम्हीघेतआहात.त्यांच्यासारखाच स्वाभिमानी बाणा,आणि अन्याय अत्याचाराविरूध्द लढण्यासाठी पुढे आले पाहिजे.सध्या देशातील शैक्षणिक पर्यावरण दूषित झाले असून शैक्षणिक क्षेत्रात नित्तिमत्तेचा ऱ्हास होत चालला आहे ती सावरण्याची जबाबदारी सर्वस्वी युवकांवर आहे.शिक्षणामुळे व्यक्ती,समाज, राष्ट्राची उन्नती होत असते.शिक्षण हेच माणसाच्या परिवर्तनाचे मोठे शस्त्र आहे.माणसाचे मन,मनगट आणि मेंदू सशक्त करण्याचे कार्य शिक्षण करते असे विचार त्यांनी यावेळी व्यक्त केली.यानंतर मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बी.ए,बी.कामॅ,बीएस्सी, पूर्ण केलेल्या तसेच पदव्युत्तर मराठी हिंदी, भूगोल वाणिज्य पदव्युत्तर पदवी पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र वितरण करून सन्मान करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप संस्थेचे अध्यक्ष अँड गुणवंतराव पाटील हैबतपूरकर यांच्या वतीने उपाध्यक्ष श्री शिवकुमार हसरगुंडे यांनी केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा डॉ सुशीलप्रकाश चिमोरे यांनी केले तर आभार डॉ सौ.यु. एस.धसवाडीकर यांनी मानले.या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीतांनी करण्यात आली, यावेळी महाविद्यालयातील आजी, माजी विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वामी विवेकानंद कॅम्पस मध्ये जागतिक महिला दिवस साजरा




उदगीर :- येथील स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेच्या स्वामी विवेकानंद महाविद्यालय, जय हिंद पब्लिक स्कूल, स्वामी विवेकानंद फार्मसी कॉलेज, स्वामी विवेकानंद नर्सिंग कॉलेज, स्वामी विवेकानंद अध्यापक महाविद्यालय येथे कार्यरत प्राध्यापिका, शिक्षक आणि शिक्षकेत्तर सर्व महिला कर्मचाऱ्याचा सत्कार करून जागतिक महिला दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमांचे अध्यक्ष म्हणून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा प्राचार्य डॉ. सुधीर जगताप उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून शासकीय रुग्णालय उदगीर येथील दंतरोग तज्ञ डॉ.सुनिता वांजे,लातूर येथील प्रसूतीतज्ञ डॉ.प्रणिता नागुरे-लोनाळे, संस्कार विद्यालयाच्या माजी प्राचार्या प्रेमलता नळगिरे, कराटे चॅम्पियन नंदनी धनुरे, संस्थेच्या व्यवस्थापिका ज्योती स्वामी, प्राचार्य डॉ. गोपाळ पवार, प्राचार्य डॉ. गणेश तोलसरवाड, प्राचार्य संजय हट्टे, प्राचार्या ज्योती तारे,उप तथा आयक्यूएसी समन्वयक डॉ. धनंजय गोंड,उपप्राचार्य सतीश वाघमारे, नॅबेटच्या समन्वयक मनोरमा शास्त्री, परीक्षा विभाग प्रमुख डॉ. शेषनारायण जाधव, रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अमर तांदळे, पत्रकारिता विभाग प्रमुख प्रा. राहुल पुंडगे यांची प्रमुख उपस्थिती होती. सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. सुधीर जगताप असे म्हणाले की, आज सर्वच क्षेत्रात महिलाचे योगदान उल्लेखनीय आहे. देशांची अर्धी लोकसंख्या असलेल्या महिला आज समाजात ताठ मानाने उभ्या आहेत.आपल्या जीवनात महिला अतिशय महत्त्वाची भूमिका बजावतात मग ती भूमिका आपल्या आईची असो,पत्नीचे असो, बहिणीची असो किंवा आजीच्या स्वरूपात असो महिलांकडून पुरुषांना प्रत्येक स्वरूपात पाठिंबा मिळत असतो. प्रत्येक पुरुषाच्या पाठीमागे एक महिला असते त्यांच्या कार्याचा आणि त्यांच्या कुटुंबातील आणि समाजातील योगदाना बद्दल आपण नेहमीच त्यांचा गौरव आणि स्वाभिमान जपला पाहिजे.. आपल्या संस्थेत कार्य करणाऱ्या महिलांची संख्या अधिक आहे. ही संस्था सुरुवाती पासून ते आजपर्यंत व यापुढे ही नेहमीच महिलांचा आदर, सन्मान व त्यांचा स्वाभिमान जपेल असे हि ते म्हणाले. यावेळी डॉ.प्रणिता नागुरे-लोनाळे,डॉ.सुनिता वांजे,प्रेमलता नळगिरे, नंदनी धनुरे यांनी देखील उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्तविक डॉ. धनंजय गोंड यांनी तर सूत्रसंचालन प्रा. ऋतुजा डिग्रस्कर, प्रा. राखी शिंदे व आभार प्रा. अमर तांदळे यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेत कार्यरत सर्व महिलांनी परिश्रम घेतले.

# उष्माघात होऊ नये म्हणून काळजी घ्या

उदगीर ( एल पी उगीले) सर्व नागरिकांनी आपल्या आरोग्याची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. वातावरणात अचानक बदल होत असून तापमान वाढलेले आहे. वाढत्या तापमानामुळे उष्माघाताची बाधा होण्याची मोठी शक्यता असते. वेळ प्रसंगी उष्माघातामुळे मृत्यू देखील होऊ शकतात. असे धोके टाळण्यासाठी नागरिकांनी काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. असे विचार प्रबोधनात्मक किर्तनकार तथा उदगीरच्या ओम हॉस्पिटल अँड मॅटर्निटी होम येथील सुप्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. शरद कुमार तेलगाने यांनी व्यक्त केले आहेत.

प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना डॉ.शारडकुमार तेलगाने म्हणाले की, नागरिकांनी उष्माघात टाळण्यासाठी शक्यतो दुपारच्या वेळी उन्हात फिरणे टाळावे. तसेच पांढऱ्या रंगाचे किंवा फिकट रंगाचे सैल कपडे घालावेत. बाहेर फिरावेच लागणार असेल तर डोक्याला रुमाल बांधावा, शक्य असेल तर डोळ्यावर गॉगल वापरावा. यामुळे डोके व डोळ्याची काळजी घेता येईल. उष्णतेमुळे शरीरातील पाणी पातळी कमी होत असते. त्यामुळे बाहेर जाताना पिण्याच्या पाण्याची बॉटल सोबत ठेवावी. तहान असो अगर नसो थोड्या थोड्या वेळाने सतत पाणी पीत राहावे. उन्हातानात काम करणारे शेतकरी, शेतमजूर यांनी आपली कामे सकाळ व संध्याकाळी करावीत. शक्यतो दुपारी काम करणे टाळावे. उन्हाळ्यात दिवसभर सतत पाणी पिणे अथवा द्रव पदार्थाचे नियमित सेवन करणे चांगले असते.

उन्हाळ्याच्या दिवसात तीव्र स्वरूपाचा ताप येणे, थकवा जाणवणे, डोकेदुखी जाणवणे, नाडीचे ठोके मंद होणे, अशक्तपणा आणि चक्कर आल्यासारखे वाटणे, उलटी होणे, हातापायाला गोळे येणे, पोटात अचानक दुखायला सुरुवात होणे, खूप घाम येणे अशा स्वरूपाचे काही प्राथमिक लक्षणे आढळून आल्यास तात्काळ आपल्या फॅमिली डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. जर खूप घाम येत असेल तर रक्तातील द्रव पदार्थ कमी होतात, त्यामुळे रक्ताचे घट्टपण वाढल्याने महत्त्वाचे अवयव प्राधान्याने मेंदू, हृदय, किडनी यांना रक्तपुरवठा व्यवस्थित होत नाही. परिणामतः हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता असू शकते. हे गांभीर्य सर्व नागरिकांनी ओळखावे. विशेष करून ज्यांना उच्च रक्तदाब, हृदयविकार, मधुमेह अशा स्वरूपाची आजार आहेत , अशांनी जास्त काळजी घेणे आवश्यक आहे. अशा रुग्णांनी दिवसभर नियमित पाणी पिणे, उन्हात न फिरणे त्याच बरोबर आरोग्यविषयक काही तक्रार असल्यास तात्काळ आपल्या डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. आपल्या परिसरात उन्हाचे प्रमाण वाढल्यास घरातील हवा खेळती ठेवावी, शक्य असेल तर पंखे, कुलर यासारख्या साधनांचा वापर करावा. वयोवृद्ध आणि लहान मुलांना शक्यतो उन्हात जाऊ देऊ नका. उपचारापेक्षा काळजी घेणे अधिक महत्त्वाचे आणि चांगले असते. याचे भान सर्व नागरिकांनी ठेवावे. असेही आवाहन डॉ. शरदकुमार तेलगाने यांनी केले आहे.

# शकुंतलादेवी बनसोडे प्राथमिक व माध्य.आश्रमशाळा शेकापूर येथील सहशिक्ष.शिंदे बी.एस.यांना मानद पदवी बहाल



उदगीर / प्रतिनिधी- शकुंतलादेवी बनसोडे प्राथमिक व माध्य.आश्रम शाळा शेकापूर ता.उदगीर जि.लातूर येथे कार्यरत असलेले विद्यार्थी प्रिय कर्तव्यनिष्ठ व उपक्रमशील शिक्षक श्री.शिंदे भरत सोपानराव यांना त्यांनी केलेल्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेत अमेरिकेच्या टोलोसा मेक्सिको विद्यापीठाने मानद डॉक्टर पदवी बहाल केली आहे.डॉ.भ.सो. शिंदे हे एक उत्कृष्ट वक्ता म्हणून सर्वपरिचित आहेत.शिंदे सरांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करत दीनदलित गोरगरीब व ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न केले आहेत.

शिंदे सरांच्या उत्तम वक्तृत्व शैलीमुळे शिक्षणापासूनच वंचित असलेल्या व निराश होऊन शिक्षण सोडून दिलेल्या विद्यार्थ्यांना त्यांनी मोटिव्हेशनल स्पीच देऊन शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन त्यांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. समाजातील अनिष्ट रूढी परंपरा याबाबत ते नेहमीच जनजागृती करत असतात.उदगीर व लातूर परिसरात एक उत्तम वक्ता म्हणून ते सर्व परिचित आहेत. सध्या कार्यरत असलेल्या आश्रम शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे ते लाडके व विद्यार्थी प्रिय असे इंग्रजी विषयाचे शिक्षक आहेत. श्री शिंदे सर यांना त्यांच्या शिक्षक कालावधीत अनेक वेळा तालुकास्तरीय,जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.शिंदे सर यांनी केलेल्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेत अमेरिकेतील टोलोसा मेक्सिको विद्यापीठाने त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील मानद डॉक्टर पदवी बहाल करून सन्मानित केले आहे.सदरचा शानदार असा पदवीग्रहण सोहळा शनिवार दि. १७/२/२०२४ रोजी सिटी फंक्शन हॉल,निजामाबाद,तेलंगाना येथे पार पडला. हा शानदार असा पदवीग्रहण सोहळा टोलोसा मॅक्सिको विद्यापीठाचे डायरेक्टर डॉ. व्ही.कट्टा.बोम्मन, व्हेटरनरी विद्यापीठ बिदरचे प्रोफेसर राज शेखर बिजुरकर, झेन मास्टर सूर्य इंटरनॅशनल चेन्नईचे डॉ. के. ए.जनार्दन यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. सदरच्या पदवी ग्रहण कार्यक्रमात देशातील सर्व राज्यातून ३५ नॉमिनींना डॉक्टरेट पडवी बहाल करण्यात आली. डॉ.भ.सो.शिंदे यांच्या यशाबद्दल शाळेचे संस्था सचिव श्रीधर राठोड अध्यक्ष ए.एस.राठोड. सर्व संस्था पदाधिकारी,मुख्याध्यापक कप्पीकेरे व्ही.जी.,सर्व शिक्षक शिक्षकेतर व वस्तीग्रह कर्मचारी,शेकापूर,उदगीर व परिसरातील सर्व शिक्षणप्रेमी नागरिकांकडून अभिनंदन होत आहे.

Niture AGRO TOURISM
निटुरे कृषी पर्यटन, उदगीर
श्री.राजराजेश्वरी मंदीरच्या समोर..

एक दिवसीय ट्रिप साठी गार्डन प्रवेश शुल्क 550रु प्रति व्यक्ती असेल वेळ सकाळी 10:30 ते सायंकाळी 5:30 या मध्ये आपणास खालील सुविधा मिळतील.

चला एकदिवस निसर्गाच्या सानिध्यात

१) सकाळी नाष्टा व चहा किंवा ज्युस
२)दुपारचे जेवण पोट भरुन
३)सायंकाळी चहा/भजे किंवा बिस्कीट
मधल्या वेळेस आपणास मनोरंजना साठी विविध प्रकार चे खेळ कॅरम,चेस क्रिकेट,वॉलीबाल झोका,पाळणा,वाचणयास पुस्तके,रेन डॉन्स, आराम करण्यास बाज,टेंट,आटोळा तेसच बास्केटबॉल,टेनिस बॉल लहाण मुलासाठी बंदुक शॉट रिंगा,बदक,घसरगुंडी,पाळणा,सायकल गाडी बैलगाडी,ट्रॅक्टर फेरी इतर भरपूर,मंदिर दर्शन सेल्फी पॉइंट इत्यादी.

फक्त गार्डन पाहाण्यास 200रु प्रतिव्यक्ती शुल्क आकारल जाईल यामध्ये आपणास नाष्टा व चहा दिला जाईल 3 तासाचा अवधी दिला जाईल

फोटोशुट 1000रु
व्हिडियो करणेसाठी 3000रु
दर आकारला जाईल

35000/- मध्ये सर्व साहित्यासहीत मंगल कार्यालयाची बुकींग चालु आहे.

१)तसेच फॅमिली सहल(एक दिवसीय) २)शाळेची सहल (एक दिवसीय)
३)बर्थडे पार्टी (एक दिवसीय) ४)गेट टुगेदर (एक दिवसीय)
५)कॉलेज सहल (एक दिवसीय) ६)एगेजमेंट पार्टी (एक दिवसीय)
७)लग्नाची पार्टी (एक दिवसीय) ८)लग्नवाढदिवसाची पार्टी (एक दिवसीय)
९)किट्टी पार्टी (एक दिवसीय)

एक दिवस अगोदर बुकिंग करणे अवश्यक आहे.

संपर्क

श्री.राजराजेश्वरी नगर, राजराजेश्वरी मंदीरच्या समोर, मल्लापूर (देगलूर रोड), उदगीर जि.लातूर